रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३०० । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ६ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹

हेटवणेचा पाणीसाठा जूनपर्यंतच

पेण : नवी मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या हेटवणे धरणाच्या पाण्याची पातळी अतिशय वेगाने घटत असून सद्यस्थितीत हेटवणे धरणात फक्त ४१ टक्के पाणी शिल्लक आहे. म्हणजेच शिल्लक असलेला ५९ दशलक्ष घनमिटर पाणीसाठा जून महिन्याच्या अखेरपर्यंत पुरवणार असल्याची माहिती हेटवणे प्रकल्पाचे उपअभियंता आकाश ठोंबरे यांनी दिली. हेटवणे धरणातून नवी मुंबईबरोबरच पेण तालुक्यालाही पाणी पुरवठा होत असतो. परंतु यावर्षी गेल्या वर्षाच्या तुलनेने पाण्याचा साठा कमी आहे. एप्रिल,

•> पान २ वर

अरुण गवळी तुरुंगातून कायमचा बाहेर

नागपूर : कुख्यात गँगस्टर अरुण गवळीची मुदतपूर्व सुटका करण्याचे आदेश नागपूर खंडपीठाच्या वतीने देण्यात आले आहेत. उत्तर देण्यासाठी जेल प्रशासनाला चार आठवड्यांचा अवधीही नागपूर खंडपीठाच्या वतीने देण्यात आला आहे. २००६ च्या शासन निर्णयाच्या आधारावर कुख्यात डॉन अरुण गवळीने शिक्षेतून सूट देण्याची मागणी केली होती. गँगस्टर अरुण गवळीच्या याचिकेवर नागपूर खंडपीठात सुनावणी पूर्ण झाली होती. मात्र, न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. त्यावर निर्णय देताना न्यायालयाने अरुण गवळी यांची मुदतपूर्व सुटका करण्याचे निर्देश दिले आहेत.

•> पान २ वर

पाणीपुरवठ्याबाबत जिल्हा परिषद काठावर पास

300 शाळा तहानलेल्या

। अलिबाग । प्रमोद जाधव । जलजीवन मिशनच्या अंतर्गत जिल्हा परिषद शाळांनादेखील मुबलक पाणीपुरवठा व्हावा, म्हणून नळजोडणी करण्यात आली. पहिली ते आठवीमधील २ हजार २१५ शाळांची नळजोडणी करण्यास जिल्हा परिषदेला यश आले आहे. मात्र आजही जिल्ह्यातील ३१३ शाळा नळजोडणीपासून वंचित असल्याचे समोर आले आहे. शाळेतील मुलांना शुध्द व मुबलक पाणी मिळावे, हा उद्देश समोर ठेवून राबविलेली ही योजना आजही अपूर्ण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत.

केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशनअंतर्गत पाणी पुरवठा करण्याचे काम रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत केले जात आहे. जिल्ह्यात एक हजार ४००हून अधिक योजना त्यासाठी मंजूर करण्यात आल्या. त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले. एकाच ठेकेदाराला ५० हून अधिक कामे देण्यात आली. मात्र ही कामे ठेकेदारांकडून पूर्ण न झाल्याने पाईप टाकूनदेखील नळाद्वारे पाणीच गावे, वाड्यांपर्यंत पोहचले नसल्याची तक्रार वाढत आहे. जलजीवन मिशन अंतर्गत शाळांनादेखील नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. जिल्ह्यात पहिली ते आठवीपर्यंत दोन हजार ५२८ शाळा असून दोन हजार २१५ शाळांमध्ये नळ जोडणी करण्यात आली आहे. मात्र ज्या शाळांमध्ये नळ जोडणी झाली आहे, त्यातील काही शाळांमधील नळाद्वारे पाणीच पोहचले नसल्याची ओरड आहे. ३१३ शाळांमध्ये अजूनपर्यंत नळ जोडणी झाली नाही. त्यामुळे शाळांमधील नळ जोडणी योजनादेखील अपूर्ण असल्याचे समोर आले आहे.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड याकडे लक्ष देतील का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

याबाबत जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांच्याशी संपर्क साधला, असता, होऊ शकला नाही.

नळजोडणी न झालेल्या शाळांवर दृष्टीक्षेप

तालुके	शाळांची संख्या
अलिबाग	२४
कर्जत	७३
खालापूर	१४
महाड	३०
माणगांव	०८
मुरुड	०६
पनवेल	३४
पेण	५५
पोलादपूर	१०
रोहा	२६
श्रीवर्धन	०४
सुधागड	१८
तळा	०९
उरण	०२

जिल्ह्यातील शाळांना नळजोडणी देण्याच्या कामाबाबत जिल्हा परिषद प्रशासन गंभीर नसल्याची बाब आकडेवारीतून उघड झाली आहे. त्यावरून जलजीवन मिशन या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीचे संबंधित यंत्रणेला वावडे असल्याचे अधोरेखित झाले आहे. काही शाळांकडे विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची नळजोडणी नसल्याचे वास्तव आहे. परिणामी, ३१३ शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पेयजलासाठी अद्यापही प्रतिक्षा करावी लागत आहे.

लोकसभेसाठी काँग्रेसचा

४८ पानी जाहीरनामा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने शुक्रवारी (दि.५) ४८ पानी जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. या जाहीरनाम्यात पाच न्याय आणि २५ गॅरंटी देण्यात आल्या आहेत. यामध्ये युवा, रोजगार, मजूर, महिलांना १ लाखांची मदत, शिक्षण, शेतकऱ्यांना एम एसपीची हमी यासह ३० लाख नोकऱ्या देण्याचे आश्वासन या जाहीरनाम्यात देण्यात आले आहे. दिल्लीत पत्रकार परिषद घेत हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला.

•> पान २ वर

काँग्रेसच्या चार मोठ्या घोषणा

वन नेशन वन इलेक्शनला विरोध केला असून लोकसभा आणि विधानसभा निवडणुका वेळेवरच होतील. मतदान ईव्हीएमद्वारे केले जाईल, परंतु व्हीव्हीपीएटी स्लिप जुळवली जाईल. १० व्या शेड्युलमध्ये सुधारणा करण्याचे आश्वासन, याअंतर्गत पक्षांतर झाल्यावर विधानसभा किंवा संसदेचे सदस्यत्व आपोआप रद्द होईल. पोलीस आणि केंद्रीय यंत्रणा कायद्यानुसार काटेकोरपणे काम करतील. प्रत्येक प्रकरण संसद किंवा राज्य विधानमंडळांच्या देखरेखीखाली आणले जाईल.

पटेल ज्वेलर्स
एक वादा Guaranteed दाम का
63,890 : 22 KT
Tel No : 022 31040000 / 1800 121 1090
Panvel, Pen, Uran, Mehsana, Modasa, Lunawada

आजचा अग्रलेख

नामांतराची उठाठेव

वे|ध|क

प्रा. शोमा सेन यांना जामीन मंजूर

नवी दिल्ली : भीमा कोरेगावर हिंसाचार प्रकरणातील आरोपी प्रा. शोमा सेन यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. त्यांच्यावर युएपीए कलमांतर्गत गुन्हा दाखल झाला होता. याचे पुरावे नसल्याने जामीन मंजूर व्हावा, अशी मागणी करणारी याचिका त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. माओवाद्यांशी संबंध असल्याचा आणि भीमा कोरेगावर हिंसाचारात गुन्हेगारी कट रचल्याप्रकरणी नागपूर विद्यापीठाच्या माजी प्रा.सेन यांच्यासह १४ कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल झाला होता.

‘एनडीएचा ४०० पारचा दावा भंपक’

सांगली : भाजपचा ४०० पारचा दावा भंपक असून सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालानंतर हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कळेल. देशात पुन्हा मोदी सरकार सत्तेवर येणार नाही असाच कल जनतेचा आहे, असा दावा खा. संजय राऊत यांनी शुक्रवारी पत्रकार बैठकीत केला. ज्या पक्षाला १०० हून जागा मिळतील, त्या पक्षाचा पर्यायाने काँग्रेसचा पंतप्रधान होऊ शकतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

सेट परीक्षेसाठी उमेदवार नोंदणीत वाढ

पुणे : सहाय्यक प्राध्यापक पदासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात येणारी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) रविवारी (दि.७) महाराष्ट्र आणि गोव्यातील केंद्रांवर होणार आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा या परीक्षेसाठी उमेदवार नोंदणीमध्ये वाढ झाली आहे. पारंपरिक (ऑफलाइन) पद्धतीने होणारी ही शेवटची परीक्षा ठरणार आहे. गेल्यावर्षी या परीक्षेसाठी एक लाख १९ हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती. तर यंदा १ लाख २८ हजार २४३ उमेदवारांनी नोंदणी केली आहे. या परीक्षेची तयारी सेट विभागाने केली आहे.

शिंदेंचे आमदार ठाकरेंच्या संपर्कात

विजय वडेट्टीवार यांचा मोठा दावा

। मुंबई । वृत्तसंस्था ।

‘ना घर का ना घाट का’, अशी वेळ शिंदे गटावर आली आहे. उद्धव ठाकरे भेटत नाही, अशी सबब सांगून शिंदे गट बाहेर पडला. पण आता त्यांना लोकसभेचे मतदारसंघही भेटत नाहीत, हे सर्वच पाहत आहेत. शिंदे गटाच्या आमदारांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. त्यांचे निम्मे आमदार उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे. शिवसेनेचे नेते खासगीत ही बाब बोलून दाखवितात. याचाच अर्थ असा आहे की, विरोधक गोंधळलेले आहेत. शिंदे गट आणि अजित पवार गटात अस्वस्थतता असून उमेदवार निवडीसंदर्भात त्यांची दमछाक होत आहे. या सर्व परिस्थितीत महाविकास आघाडी महाराष्ट्रात तरी महायुतीचा विजय रथ रोखेल, असा दावा विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारांचे चित्र आता जवळपास स्पष्ट झाल्यानंर राजकीय पक्ष आणि पुढारी प्रचाराला लागले आहेत. त्यामुळे

•> पान २ वर

मीनाक्षी पाटील यांच्या निधनाने समाजाची हानी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला शोक

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या मीनाक्षी पाटील एक लढवय्या नेत्या होत्या. रायगडसह संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या वक्तृत्वाच्या व अभ्यासाच्या जोरावर एक वेगळी छाप त्यांनी टाकली. कारण गोरगरीब, पीडित, अन्यायग्रस्त, भूमीपुत्रांच्या हितासाठी लढणाऱ्या त्या नेत्या होत्या. त्यांच्या निधनाने समाजाची मोठी हानी झाली आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. पाटील कुटूंबियांचे सांत्वन करण्यासाठी शुक्रवारी (दि.५)एकनाथ शिंदे पेझारी येथे आले होते. त्यावेळी सांत्वनपर शोक व्यक्त करताना ते बोलत होते.

यावेळी आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, आ. भरत गोगावले, आ. महेंद्र थोरवे, अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, माजी जि.प. सदस्या भावना पाटील, चित्रा पाटील, जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, राजन पाटील, नीता पाटील, युवा नेते सवाई पाटील, सुमन पाटील आदी उपस्थित होते.

याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मीनाक्षी पाटील यांनी राजकारणापलिकडे जाऊन संबंध जपले होते. त्यांनी आमदार, राज्यमंत्री अशी अनेक पदे भूषविली. प्रत्येकाशी मायेने, प्रेमाने बोलणे,

•> पान २ वर

भाजपरूपी बकासुराचा वध जनताच करणार : अनंत गीते

। नागोठणे । वार्ताहर ।

राज्यात १०६ आमदार निवडून आल्यानंतर भाजपाने एक प्रभावी विरोधी पक्षाची भूमिका पार पाडली असती तर भविष्यात जनतेने त्यांना एकहाती सत्ता दिली असती. मात्र मासा जसा पाण्यावाचून तडफडतो, तसे सत्तेसाठी ते कुकर्म करत गेले. सेना फोडून सत्तेत सहभागी झाले. बहुमत झाल्यानंतरही यांची भूक न भागल्याने त्यांनी राष्ट्रवादी फोडली. तरीही त्यांची भूक न भागल्याने त्यांनी अशोक चव्हाणांना फोडले. त्यामुळे भिमाने जसा बकासुर राक्षसाचा वध केला. तसाच महाराष्ट्राची जनता सुज्ञ असल्याने भाजपरुपी बकासुराचा वध नक्कीच करेल. त्यामुळे रायगडच्या निवडणुकीची मला चिंता नसल्याचा दृढ आत्मविश्वास इंडिया आघाडीचे रायगड लोकसभेचे उमेदवार अनंत गीते यांनी व्यक्त केला.

> **मी कोणत्याही राजकीय पक्षाची प्रतिनिधी नसून ३३ वर्षे जनचळवळीत आहे. मात्र संविधान बदलण्यास निघालेल्या भाजपविरोधात मी व्यासपीठावर आली आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन भाजपा हटाव, देश बचाव या चळवळीत सहभागी व्हावे.**
>
> **– उल्का महाजन,**
> **सामाजिक कार्यकर्त्या**

नागोठण्यातील गांधी चौकात शुक्रवारी (दि.५) आयोजित केलेल्या जनसंवाद सभेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अनिल तटकरे, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे

•> पान २ वर

तटकरेंना भाजप निष्ठावंतांचा विरोध

। पेण । प्रतिनिधी ।

हमरापूर विभागामध्ये दोन दिवसापूर्वी खा. सुनील तटकरे यांच्या सभेचे आयोजन केले होते. या सभेला आघाडी धर्म न पाळता भाजपच्या कार्यकर्त्यांना व पुढाऱ्यांना राष्ट्रवादीकडून आमंत्रण देण्यात आले नाही. तसेच खा.सुनील तटकरे यांनी गेल्या पाच वर्षातील पेण तालुक्यातील विकासकामांना दिलेली दुजाभाव वागणुकीमुळे भाजपच्या कार्यकर्त्यांना सुनील तटकरे यांची उमेदवारी मान्य नसल्याचा सूर पेण तालुक्यात उमटत आहे. सुनील तटकरे यांची उमेदवारी मान्य नसल्याने हमरापूर विभागातील भाजपचे सक्रिय कार्यकर्ते तथा भाजप किसान मोर्चा

•> पान २ वर

प्रवाशांकडून यूपीआयद्वारे तिकीट खरेदी

रायगडच्या एसटीची डिजिटल भरारी

। रायगड । प्रतिनिधी ।

एसटी महामंडळाच्या बसमध्ये तिकीट काढताना प्रवाशांचा अनेक वेळा वाहकासोबत वाद होतो. सुट्ट्या पैशांवरून वाद होवू नये, यासाठी एसटी महामंडळाने डिसेंबर २०२३ मध्ये डिजिटल पेमेंटला सुरुवात केली. रायगड जिल्ह्यातील रामवाडी वाहतूक विभाग अंतर्गत असणाऱ्या एसटी आगारांमध्ये या सुविधेला प्रवाशांचा प्रतिसाद मिळत आहे. प्रवासी यूपीआय पेमेंटद्वारे तिकीट काढत आहेत. यामुळे दरमहा सुमारे दोन लाख रुपये महसूल नव्या यूपीआय पेमेंटद्वारे थेट एसटीच्या बँक खात्यात जमा होत आहे. तसेच वाहकाचे सुट्टे पैसे सांभाळण्याचे कामही हलके होत आहे.

सर्वत्र डिजिटल पेमेंटचा पर्याय उपलब्ध आहे. त्यामुळे बहुसंख्य प्रवासी रोख व्यवहार करण्याऐवजी ऑनलाईन व्यवहार करणे पसंत करतात. एसटी महामंडळानेही डिजिटल व्यवहाराचा पर्याय प्रवाशांना उपलब्ध केला आहे. प्रवाशांना बसमध्ये तिकिट काढण्यासाठी फोन पे, गूगल पे यांसारखी सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. वाहकाकडील अँड्राईड तिकीट यंत्रावरील क्युआर कोडद्वारे प्रवाशांना तिकीटाचे पैसे डिजिटल स्वरूपात देणे शक्य होत आहे. या सुविधेमुळे प्रवाशांचा सुट्ट्या पैशांवरून वाहकासोबत होणारा वाद संपुष्टात येऊ लागला आहे, असे रायगड वाहतूक नियंत्रक दीपक घोडे यांनी सांगितले.

रायगड जिल्ह्यात एसटीतून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. या तुलनेत यूपीआय पेमेंटद्वारे तिकीट काढणाऱ्या प्रवाशांची संख्या कमी आहे. एसटी महामंडळातील सर्वच वाहकांकडे अँड्रॉईड इलेक्ट्रिक तिकीट यंत्र आहे. बहुतेक वाहकांना हे मशीन जलदगतीने व्यवस्थित हाताळता येत नाही. त्यामुळे वाहक प्रवाशांकडे रोख रकमेने तिकीट काढण्याचा आग्रह धरतात. तसेच यूपीआय पेमेंटबाबत प्रवाशांमध्ये प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे आहे. तसेच वाहकांना अँड्रॉईड इलेक्ट्रिक तिकीट यंत्र चालवण्याबाबत प्रशिक्षित करणे गरजेचे आहे, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

सादर आहे
सौंदर्य
EXQUISITE JEWELLERY
गुढीपाडवा आणि लग्नसराईसाठी खास ऑफर
सोने व चांदीच्या दागिन्यांच्या मजुरीवर 15% off*
हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर 50% off*
त्वरा करा, हि सुवर्ण संधी 6 ते 14 एप्रिल पर्यंत!
WHP
वामन हरी पेठे ज्वेलर्स™
सोनेरी क्षणांचे सोबती!®
Shop No.: 1, Ground Floor, Survey No.: 9, Revdanda Road, Near Nagar Palika,
Alibaug, Dist Raigad - 402201. Tel.: 02141-221377/477, 9022728828
www.whpjewellers.com

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ एप्रिल

१) श्रीम. सीताबाई रामचंद्र थळे
सारळ, अलिबाग, ६-४-१९४५
२) श्रीम. सुनिता पांडुरंग पाटील
सारळ, अलिबाग, ६-४-१९४४
३) श्रीम. माधवी महादेव पाटील
नवगाव, अलिबाग, ६-४-१९५५

दुकानात चोरी करणारा तरुण पोलिसांच्या ताब्यात

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ बाजारपेठ भागातील एका किराणा दुकानात एक तरुण चोरी करीत असल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. संबंधित प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल नसतानादेखील गुप्तचर विभागातील कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे त्या तरुणाला चोरलेल्या किरकोळ वस्तुंसह ताब्यात घेण्यात यश आले आहे. नेरळ पोलिसांनी कोणतीही तक्रार दाखल नसताना केलेली कारवाईबद्दल नेरळ पोलिसांचे कौतुक होत आहे.

नेरळ बाजारपेठमधील एका छोट्या किराणा मालाच्या दुकानात एक मुलगा खरेदी करण्याचे बहाण्याने चोरी करत आहे.तसा व्हिडीओ नेरळ आणि कर्जत परिसरातील समाजमाध्यम यांच्यावर व्हायरल झाला होता.परंतु, कमी रक्कम चोरी गेलेली असल्याने दुकानदार यांनी तक्रार दिली नव्हती. तरीसुद्धा नेरळ पोलीस ठाण्यामधील गुप्तचर विभागाच्या कर्मचाऱ्यांनी नेरळ बाजारपेठेमध्ये गस्त घातली होती.त्यावेली चोरी करणारा मुलगा दिसला असता त्यांनी त्यास ताब्यात घेवून विचारपुस केली. पोलिसांनी त्याला पोलिसी खाक्या दाखविताच त्या मुलाने नेरळ बाजारपेठेमध्ये दुकानात चोरीचा गुन्हा केल्याचे कबूल केले.

त्यानंतर फिर्यादी यांना बोलवून गुन्हा दाखल केला.आरोपी हा विधीसंघर्षित बालक असून तो खोपोली येथील राहणारा आहे.आरोपीकडून गुन्ह्यातील चोरी केलेली सर्व रक्कम हस्तगत झाली आहे. आरोपीस त्याचे नातेवाईकांच्या ताब्यात दिले आहे.पुढील कार्यवाही नेरळ पोलीस करीत आहेत.

मतदान टक्का वाढविण्यावर भर

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनानुसार होणार अंमलबाजणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या अनेक दिवसांपासून प्रशासन कामाला लागले आहे. या निवडणूकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न सुरु केले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनानुसार कृती आराखडा तयार करून सर्व विभागामार्फत प्रभावी अंमलबजावणी करून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

GO VOTE
IT'S COOL

लोकशाहीचा उत्सव म्हणजे मतदान, या उत्सवात प्रत्येक मतदाराने आपला सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. प्रत्येक मतदाराला मतदानासाठी प्रवृत्त करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिल्या आहेत. जिल्ह्यातील सर्व मतदारांपर्यंत मतदान केंद्रांची माहिती पोहोचवणे. मतदान केंद्रांवर वीज, पाणी, मंडप यासह सर्व मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देणे. दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत आणण्यासाठी सुक्ष्म नियोजन करणे. जिल्ह्यातील सर्व घटकांच्या प्रबोधनासाठी प्रयत्न करावेत असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीमार्फत कार्यवाही केली जाणार आहे. मतदानाचा टक्का वाढवून लोकशाही बळकट करण्याचा प्रयत्न प्रशासनामार्फत केला जाणार आहे.

रायगड जिल्ह्यातील आदिवासी पाडे, वाड्या,वस्ती येथे मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी. रोजंदारीवर जाणाऱ्या मतदारांना पगारी सुट्टी देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या मतदारांचे पहिल्या सत्रात मतदान घेण्यासाठी ग्रामसेवक, तलाठी तसेच निवडणूक यंत्रणांची मदत घेतली जाणार आहे. मतदार यादीत नाव असलेल्या जिल्ह्याबाहेरील मतदारांना मतदार चिठ्ठीचे वाटप करून त्यांनादेखी मतदान करण्यासाठी प्रवृत्त केले जाणार आहे.

अन् ऐनवेळी उमेदवार बदलला

। यवतमाळ । प्रतिनिधी ।

वंचितबहुजनआघाडीनेयवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघासाठी गाजावाजा करत जाहीर केलेला उमेदवार ऐनवेळी बदलविला. नामांकनाच्या अखेरच्या दिवशी वंचितकडून ज्या उमेदवाराने अर्ज दाखल केला, त्यात त्रुटी निघाल्याने तो बाद झाला. त्यामुळे वंचित निवडणुकीपासून वंचित राहणार आहे. वंचितच्या नेत्यांच्या धरसोड वृत्तीने वंचितच्या हातातून 'तेलही गेले,अन तुपही गेले',अशी अवस्था झाल्याची चर्चा आहे.

अखेरपर्यंत वंचित बहुजन आघाडीचे महाविकास आघाडीसोबत सूत जुळले नाही.त्यामुळे वंचितच्या पहिल्या यादीत यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघातून दारव्हा तालुक्यातील सुभाष पवार यांना उमेदवारी घोषित करण्यात आली. त्यांनतर झालेल्या घडामोडीत प्रकृतीचे कारण पुढे करत सुभाष पवार यांचे तिकीट कापून ती राठोड यांना देण्यात आली. अभिजित राठोड यांनी समर्थकांच्या उपस्थितीत नामांकन अर्ज दाखल केला होता.

उमेदवारी अर्जांच्या छाननी प्रक्रियेत वंचितचे उमेदवार अभिजित राठोड यांचा नामांकन अर्ज रद्द करण्यात आला आहे. हा अर्ज नेमका कशामुळे रद्द झाला यासंदर्भात अधिकृत माहिती प्रशासनाने अद्याप दिली नाही. मात्र महायुती आणि महाविकास आघाडीला गठ्ठा मतदानाच्या भरवशावर टक्कर देणारा महत्वाच्या पक्षाचा उमेदवार आता रिंगणात राहणार नाही. बंजारा मतांचे विभाजन करण्यासाठी वंचितने ही खेळी केली पण, वंचितचा डाव त्रुटीत अडकल्याने वंचितची मते कोणाच्या पथ्यावर पडतील, याचे गणित मांडणे सुरू झाले आहे.

नांदगाव हायस्कूलची प्रचार फेरी

। मुरुड । वार्ताहर ।

भारतीय निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी ठरवले आहे. याच उद्देशाने गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या आदेशानुसार, मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड-अलिबाग विधानसभा मतदारसंघातील मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील सहजीवन विद्यामंडळ संचलित श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर येथे प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये मोठ्या संख्येने शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सदरील प्रभात फेरी ही खारीक वाडा या गावातून, नांदगाव बाजारपेठेमधून सुळपेठ मार्गे पुन्हा शाळेत आणण्यात आली.सदरील फेरीमध्ये सुमारे ४५० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. प्रभात फेरीचे यशस्वी आयोजन करण्यासाठी दतात्रेय खुळपे, प्रतीक पेडणेकर, सागर राऊत , शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर व सर्व शिक्षक- शिक्षिका यांनी विशेष प्रयत्न केले.

प्रभात फेरीमध्ये मतदानाबाबत लोकांमध्ये जागृती होण्यासाठी विविध घोषणा देण्यात आल्या. तसेच विविध फलक तयार करण्यात आले होते. मतदानाचे महत्त्व लोकांना पटावे, यासाठी या रॅलीचे विशेष आयोजन करण्यात आले होते.

कॉलनी फोरमचे पदाधिकारी मातोश्रीवर

पनवेल : पालिका हद्दीतील दुहेरी मालमत्ता कराचा मुद्दा उचलून लढत असलेल्या कॉलनी फोरम च्या पदाधिकाऱ्यांनी आज 'मातोश्री'वर युवा सेना अध्यक्ष आदित्य ठाकरे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी फोरमच्या पदाधिकाऱ्यांनी आदित्य ठाकरे यांच्याशी मालमत्ता कर तसेच पालिका हद्दीतील विविध समस्या बाबत चर्चा केल्याचे समजते. शिवसेना रायगड जिल्हा यांच्या वतीने, मावळ लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांना पाठिंबा देण्यासाठी कॉलनी फोरमकडे मागणी करण्यात आली होती. त्या अनुषंगाने ही भेट घेण्यात आली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मित्र पक्षांच्या बैठकीत ठरणार प्रचाराची दिशा

। कर्जत । वार्ताहर ।

मावळलोकसभानिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीच्या मित्र पक्षांनी ही निवडणूक लढविताना एकत्रित प्रचार केला पाहिजे. १० एप्रिल रोजी सर्व मित्र पक्षांची आढावा बैठक होणार आहे. त्यावेळी प्रचाराची दिशा ठरविण्यात येईल. इंडिया आघाडीच्या मित्र पक्षांनी नियोजनबद्ध काम केल्यास आपल्या उमेदवाराचा विजय निश्चित आहे. असा विश्वास उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे तालुका प्रमुख उत्तम कोळंबे व तालुका काँग्रेसचे अध्यक्ष संजय गवळी यांनी व्यक्त केला.

शिवालय कार्यालयात इंडिया आघाडीतील काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, कर्जत तालुकाध्यक्ष संजय गवळी, प्रदेश प्रतिनिधी मुकेश सुर्वे, शहर अध्यक्ष अनंत देवळे, नेरळ शहर अध्यक्ष आनंद मोडक, माजी शहर अध्यक्ष पुंडलिक भोईर, सचिव सुभाष मदन, दिनानाथ देशमुख, नेरळ शहर महिला अध्यक्ष नंदा सोनटक्के, दीपाली पाटील, गोपीनाथ देशमुख, गणपत झुगरे, दिनेश पाटील, संतोष म्हसकर, मनेष राणे, खंडू गावंडा, सूरज पंडित, संतोष सुरवसे आदी उपस्थित होते.

दीनानाथ देशमुख यांनी पक्षाने सारे काही देऊनही पक्षातील नेते पक्ष सोडून गेले. परंतु कार्यकर्ते जागेवरच आहेत. तालुक्यातील सहाही जिल्हा परिषद वार्डात जाऊन कार्यकर्त्यांना विश्वासात घेणे गरजेचे आहे. त्यांच्या चारशे पार घोषणेपेक्षा उद्धव ठाकरे यांची भाजपा तडीपार ही घोषणा लोकांना भावत आहे. असे स्पष्ट केले. सुभाष मदन यांनी, सर्वांनी एकत्रित काम केले पाहिजे. त्यासाठी नियोजन महत्वाचे आहे. असे सूचित केले.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचे संचलन

। पेण । प्रतिनिधी ।

पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीत लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशाने संयुक्त संचलन व दंगल काबू सुरक्षा राबवण्यात आली.

लोकसभा निवडणूक व येणाऱ्या यात्रा तसेच सणांच्या गुढीपाडवा, बौध्द पौर्णिमा, रमजान ईद या सणांच्या पार्श्वभूमीवर पेण पोलीस ठाणे परीसरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने गुरुवारी उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, सहाक्क्यक पोलीस निरीक्षक गवई, महिला पोलीस उपनिरीक्षक सांगळे, पोलीस हवालदार प्रकाश कोकरे, अमोल म्हात्रे अंमलदार, राकेश पवार, आरपीसी टीम यांनी पेण शहरात संयुक्त संचलन व दंगल काबू सुरक्षा प्रात्यक्षिक करुन राबवण्यात आली.

पोलिसांकडून दंगल काबू सुरक्षा प्रात्याक्षिके

निवडणूक व येणाऱ्या सणांच्या पाश्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टीने संचलन करण्यात आले. या संचनलामध्ये ३ अधिकारी व २७ अमंलदार तसेच दंगल काबू सुरक्षा पथकाने सहभाग घेतला होता. पेणमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयापसून संचलना सुरुवात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जामा मशीद खान मोहल्ला, महावीर मार्ग खाटीक मोहल्ला, कोळीवाडा नाका, पं.का.पाटील चौक, राजू पोटे मार्ग, कोतवाल चौक, आंबेडकर चौक आणि संचलनाचे विर्सजन उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पटांगणात झाले.

मिनी गुढ्यांना नागरिकांकडून मागणी

। उरण । वार्ताहर ।

गुढी म्हणजे आनंद, विजय आणि स्वागताचे प्रतिक. उंच बांबूपासून गुढी तयार केली जाते. बांबूच्या एका टोकाला रेशमी कापड, कडुलिंबाचा, पाला, फुलांचा हार आणि साखरेची माळ बांधून त्यावर धातूचे भांडे (तांब्या) बसवला जातो. नंतर गुढी पाटावर उभी केली जाते. याच गुढीपाडव्यापासून मराठी नववर्ष सुरूहोते. यंदा येत्या मंगळवारी म्हणजेच ९ एप्रिल रोजी गुढीपाडवा आहे.

गुढीपाडवा मंगळवार (दि. ९) रोजी असल्याने उरण बाजारात ठिकठिकाणी मिनी गुढ्या विकावयास आल्या असून नागरिक त्या खरेदी करण्यासाठी नागरिकांची लगबग सुरु आहे . सध्याच्या धावपळीच्या युगात साहित्याची जमवाजमव करून गुढी उभारण्यासाठी पुरेसा वेळही मिळणे कठीण झाले आहे तसेच मोठी गुढी उभारायला शहरात जागेचाही प्रश्न असतो. याला पर्याय म्हणूनच रेडिमेड गुढीचा नवा ट्रेण्ड निर्माण झाला आहे. बाजारात या मिनी गुढ्या विक्रीस येऊ लागल्या आहेत. लहानात लहान ६ इंच असून दोन फुटापर्यंत बाजारात उपलब्ध आहेत.

पाट आणि त्यावर असलेले नक्षीदार कापड, नारळ, तांब्या, आंब्याची पाने, गुढीभोवती असलेले कापड, हार इत्यादी सर्व साहित्याचा समावेश रेडिमेड गुढीमध्येही पहावयास मिळतो. त्यामुळे या सगळ्या साहित्याची जमवाजमव करण्यापेक्षा या रेडिमेड गुढ्या घेण्याकडेच लोकांचा ओढा अधिक दिसून येत आहे. सुंदर नक्षीकाम, चमकदार कापड व आकर्षक सजावटीमुळे या मनमोहक रेडिमेड गुढ्या खरेदी करण्याचा मोह नागरिकांना होत असल्याचे चित्र ठिकठिकाणी पहावयास मिळत आहे.

या पार्श्वभूमीवर उरण येथील बाजारपेठांमध्ये विविध आकाराच्या आकर्षक गुढ्या ग्राहकांना भूरळ घालत आहेत. गेल्या चार- पाच वर्षांपासून रेडिमेड गुढीचा ट्रेण्ड बाजारात आला असून अलिकडे या छोट्या गुढ्यांना ग्राहकांची जास्त मागणीआहे .साधारण ८० ,१२० ,१४० २०० ते २५० रुपयांपर्यंत विविध आकाराच्या गुढ्या बाजारात उपलब्ध आहेत. असल्याचे हरीलाल जनरल स्टोअर्सचे मालक यश मेहता यांनी सांगितले.

उन्हाळ्याच्या सुट्टीत पर्यटकांची पावले वळणार मुरूडकडे

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड शहरात पारा सकाळी ३२ अंश असतो. सकाळी थंड तर दुपारी गरम वातावरण असल्याने समुद्राच्या गार पाण्यात थंड होण्यासाठी पर्यटक उन्हाळी सुट्टी मुरूडला आनंद लुटण्यासाठी दाखल होण्यास सुरूवात झाली आहे.

त्यात नुकतेच सुरु झालेले वॉटर पार्क, समुद्रावरील बोटिंग, मिनी बाईक, उंट सवारीसोबत ४०० वाहने पार्कींग होतील अशी पार्किंग सुरु झाल्याने यावर्षी मुरूडला सर्वाधिक पर्यटक भेट देण्यासाठी नियोजन करीत असल्याचे सुरू असलेल्या हॉटेल बुकिंगवरून समजत आहे. मुरुड शहरात रस्ते व नारळी पोफळीच्या बागा, किनाऱ्यावरील भेळपुरी, विविध चाट, नारळपाणी याचा स्वाद घेण्यासाठी पर्यटक मुरुडकडे वळले आहेत.

राज्यात सर्वत्र परीक्षेचा हंगाम संपल्याने कोकणातील समुद्रकिनाऱ्याकडे पर्यटकांनी धाव घेतली आहे. पर्यटनस्थळांवर पर्यटकांची गर्दी राहणार आहे. सुट्टी लागून आलेल्या वीकएण्डमुळे पर्यटनप्रेमींना मोठा लाभ झाला आहे. मुरुड शहरात सायंकाळी आल्हाददायक व सुंदर वातावरण आहे. समुद्र शांत असल्याने मासमारी चांगली होते. यामुळे पर्यटकांना मनसोक्त ताजे मासे खाण्याचा आनंद घेता येणार आहे. मुरुडसारखी चवदार मासे रायगडात कोठेच मिळत नाही. मुरुडला सुक्या मासळीचा बाजार मोठा असल्याने मुंबई, पुणे , कोल्हापूर येथील पर्यटक खरेदीसाठी येतात. सुके बोंबील, सुकट, खार सुरमई, सर्वात प्रसिध्द ताजे सोडे याची खरेदी विक्री उन्हाळी सुटीत मोठ्या प्रमाणात होते.

मुरुड समुद्रकिनारी असलेली हॉटेल उन्हाळी सुट्टीसाठी सज्ज झाली आहेत. समुद्रकिनारी असलेली सर्व हॉटेल गरम वातावरणामुळे वातानुकूलित करण्यात आली आहेत. नवनवीन चविष्ट पदार्थांचे स्टॉल हॉटेलसमोर लावण्यात आले आहेत. हॉटेलात लहान मुलांसाठी खेळणी तसेच खेळाचे साहित्य देण्याची सोय करण्यात आली आहे.

नगरपालिकेने समुद्रकिनारी असलेली विश्रामधाम बागेचे नूतनीकरण केल्याने त्याचा लाभ येणाऱ्या पर्यटकांना होणार आहे. पालिकेचे कर्मचारी समुद्रकिनारी दिवसातून ३ वेळा स्वच्छ करतात. मुरुडला असणारे जलदुर्ग जंजिरा व पद्मदुर्ग पर्यटकांसाठी सज्ज झालेत.

पान १ वरून

हेटवणेचा पाणीसाठा जूनपर्यंतच

मे आणि जून या महिन्यांपर्यंत हा पाणीसाठा उपलब्ध होऊ शकतो. परिणामी, मान्सून वेळेवर सुरू झाला नाही तर याचा फटका नवी मुंबईसह पेण तालुक्याला सोसावा लागणार आहे. मात्र मान्सूनची सुरूवात यंदा हवामान खात्याच्या अंदाजानुसार ११ जूनपर्यंत होणार असल्याने हेटवणे धरणातील पाणीसाठा हा नवी मुंबईसह पेण तालुक्याला पुरणारा आहे. असे असले तरी पाणी जपून वापरण्याचे आवाहनदेखील आकाश ठोंबरे यांनी केले.

शिंदेंचे आमदार ठाकरेंच्या संपर्कात

एकमेकांच्याविरोधात टीका-टिप्पणीला जोर आला आहे. महायुतीच्या जागावाटपात शिंदे गटाला झुकते माप घ्यावे लागले आहे. त्यांनी जाहीर केलेल्या एका उमेदवाराला ऐनवेळी मागे घ्यावे लागले तर यवतमाळच्या विद्यमान खासदाराचा पत्ता कट करण्यात आला. विदर्भात काँग्रेसला अनुकूल असे वातावरण आहे. काँग्रेसचा पाचही जागांवर विजय होईल. लोकांमध्ये सत्ताधाऱ्यांबाबत प्रचंड नाराजी आहे. स्वतंत्र भारतात आपण गुलाम होऊ, अशी भीती लोकांना वाटत आहे. त्यामुळे भाजपाला सत्तेबाहेर काढायचे, असे लोकांनी ठरविले असल्याचेही वडेट्टीवार म्हणाले.

यापुढे वडेट्टीवार म्हणाले की, राहुल गांधी यांची विदर्भात जाहीर सभा होणार आहे. विदर्भातील लोकांचा पाठिंबा या सभेला मिळेल. राहुल गांधी यांनी त्याग आणि संघर्ष सुरू केला आहे. त्यामुळे राहुल गांधी यांच्याबद्दल एक वेगळे वातावरण सामान्य जनतेमध्ये निर्माण झाले आहे. त्यांच्या सभेला प्रचंड गर्दी होईलच. तसेच पाचही लोकसभा मतदारसंघात या सभेमुळे एक परिवर्तनाची लाट निर्माण झाल्याचे दिसेल. सांगलीच्या जागेबाबत आता वाद घालण्यात अर्थ नाही, असे सांगताना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, सांगली मतदारसंघावर सुरुवातीपासूनच काँग्रेसचा दावा होता. पण आता आम्ही हा विषय ताणून धरणार नाही. आमचे पक्षश्रेष्ठी याबाबत निर्णय घेणार आहेत. त्यानुसार आम्ही काम करू. परंपरागत जागा दुसऱ्या पक्षाला गेल्यानंतर सुरुवातीला थोडी नाराजी असते. पण ती दूर करण्याचा प्रयत्न करू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भाजपरूपी बकासुराचा वध जनताच करणार : अनंत गीते

गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख विष्णू पाटील, सहसंपर्क प्रमुख किशोर जैन, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस नंदा म्हात्रे, शेकाप नेते शंकरराव म्हसकर, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल नवगणे, सर्वहारा जन आंदोलन प्रमुख उल्का महाजन, सुरेंद्र म्हात्रे, अविनाश म्हात्रे, सुधीर ढाणे, सुनील देशमुख, समीर शेडगे, संजय भोसले, संजय महाडिक, डॉ. मिलिंद धात्रक, सुरेश जैन, अशपाक पानसरे, बिलाल कुरेशी, नागोठणे सरपंच सुप्रियाताई महाडिक, उपसरपंच अखलाक पानसरे, संजय काकडे, कार्तिक जैन, धनंजय जगताप, ज्ञानेश्वर साळुंखे, वांगणी सरपंच सोनम भोसले, वरवठणे सरपंच ऋतुजा म्हात्रे, धनवंती दाभाडे, दीप्ती दुर्गावले, कांचन माळी, डॉ. अन्वर हाफिज, प्रणिता पत्की, अनिल महाडिक, राजेंद्र वाळंज, मोहन नागोठणेकर, अजित दळवी, प्रणव रावकर, शेखर जोगत आदींसह इंडिया आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अनिल तटकरे म्हणाले की, पवार साहेब मुख्यमंत्री असतांना त्यांनी आयपीसीएल प्रकल्पग्रस्तांना नोकरीला लावले. नागोठण्यातील जनता सुज्ञ आहे. माझ्या ५० हजार मतांत नागोठण्याचा मोठा वाटा आहे. येथील शुद्ध पाणीपुरवठा योजनेचे पत्र मी सर्वपक्षीय नेत्यांना एकत्र बोलवून दिले होते. तसेच येथील एक मुस्लीम भगिनी निलोफर पानसरेंना सरपंच केल्याचा मला आनंद असल्याचेही सांगून आज बॅ. अंतुले साहेब हयात असते तर त्यांनीही गीतेंनाच आशिर्वाद दिले असते, असे बोलून अनंत गीतेंना विजयी करण्याचे आवाहन केले.

गांधी चौकात सभा सुरु झाल्यानंतर थोड्याच वेळाने पवित्र रमजानमधील अजान झाल्यानंतर थोडावेळ सभा स्थगित करण्यात आली. यावेळी उपस्थित मुस्लीम बंधू-भगिनींनी त्यांना एक मुस्लीम तरुण अशपाक सुमरा यांच्याकडून वाटण्यात आलेले खजूर खाऊन, पाणी पिऊन रोजा इफतार केला. नंदा म्हात्रे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सद्यस्थितीत काँग्रेसच देश वाचवू शकतो. आम्ही चिन्ह, उमेदवार बघत नाही तर मोदी नावाच्या माणसाला घरी कसे पाठवायचे हे बघत असल्याचे सांगितले. तसेच शंकरराव म्हसकर यांनी जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडणाऱ्या, स्वच्छ चारित्र्याच्या तसेच पाय जमिनीवरच असलेल्या गीतेंना निवडून देण्याचे आवाहन केले. सभेचे सूत्रसंचालन प्रकाश कांबळे व कीर्तीकुमार कळस यांनी केले.

नागोठणे ग्रामपंचायतीत सर्वजण येऊन गेले. मात्र समारोपाला गांधी चौकात एकच सभा घेऊन विरोधकांना भुईसपाट करीत १७ पैकी १६ जागा जिंकून इंडिया आघाडीचा पहिला विजय नागोठण्यात साकारला. गांधी चौकात आपली सभा झाली की, १०० टक्के विजय आपलाच! अशी ही जागा असल्याने ही सभा म्हणजे गीतेसाहेब खासदार झाल्यासारखेच आहे. शहरातच दोन-अडीच हजारांचा लीड मिळणार नक्की मिळणार. - किशोर जैन

अरुण गवळी तुरुंगातून कायमचा बाहेर

मुंबईतील नगरसेवक कमलाकर जामसांडेकर हत्या प्रकरणात तसेच, इतर गुन्हेगारी कृत्य केल्याप्रकरणी गवळीला दोन वेळेला जन्मठेपेची शिक्षा झाली होती. सध्या अरुण गवळी नागपूच्या तुरुंगात शिक्षा भोगत आहे. वयाची ६५ वर्षे पूर्ण झालेल्या अशक्त, निम्मी शिक्षा भोगलेल्या कैद्याला शिक्षेत सूट मिळते. त्यानुसारच डॉन अरुण गवळीने शिक्षेतून मुदतपूर्व सुटकेची मागणी केली होती.

४८ पानी जाहीरनामा

यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, सोनिया गांधी यांच्यासह आदी नेते उपस्थित होते.

काँग्रेसने प्रसिद्ध केलेला जाहीरनामा 'ग्यान' या संकल्पनेवर आधारित प्रसिद्ध करण्यात आला आहे. यामध्ये जी-गरीब, वाय- युवा, ए-अन्नदाता, एन - नारी, अशी काँग्रेसची संकल्पना आहे. पक्षाच्या जाहीरनाम्यात मजुरी वाढवून दररोज ४०० रुपये करणे, गरीब कुटुंबातील महिलांना वर्षाला १ लाख रुपये देणे, एमएसपीसाठी कायदा करणे आणि जात जनगणना करणे यांचा उल्लेख आहे. तरुण, महिला, मजूर आणि शेतकरी यावर लक्ष केंद्रित केले आहे. या सर्व विभागांसाठी विविध प्रकारच्या योजनांचे आश्वासन देण्यात आले आहे.आपला जाहीरनामा वर्क, वेल्थ आणि वेलफेअर यावर आधारित असल्याचे पक्षाने म्हटले आहे. येथे वर्क म्हणजे रोजगार, वेल्थ म्हणजे उत्पन्न आणि वेलफेअर म्हणजे सरकारी योजनांचा लाभ देणे आहे.

मीनाक्षी पाटील यांच्या निधनाने समाजाची हानी

त्यांना मदत करणे ही त्यांच्या मनात भावना होती. एक लोकप्रतिनिधी कसा असावा, याचे उत्तम उदाहरण म्हणजे मीनाक्षी पाटील. एखादा प्रश्न त्यांनी हाती घेतल्यावर त्या प्रश्नाची सोडवणूक केल्याशिवाय त्या कधीच गप्प बसल्या नाहीत. एक आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख होती. अभ्यासू व चांगले वक्तृत्व लाभलेल्या त्या नेत्या होत्या. त्यांच्या जाण्याने समाजाचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यांचा आदर्श लोकप्रतिनिधींसह सर्व कार्यकर्त्यांनी घ्यावा, असे शिंदे यांनी सांगितले.

तटकरेंना भाजप निष्ठावंतांचा विरोध

उपाध्यक्ष, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, ग्रामपंचायत जोहेचे सदस्य काशिनाथ पाटील यांनी पक्षातील पदाचा राजीनामा देत असून कोणत्याही परिस्थितीत सुनील तटकरे यांचे काम करायचे नसल्याचे कृषीवलशी बोलताना सांगितले.

यापुढे काशिनाथ पाटील यांनी सांगितले की, पक्ष जर भ्रष्टाचारी माणसांना आमच्या मानगुटीवर बसवत असेल तर आम्ही ते मान्य करणार नाही. तटकरेंना निवडून देणे म्हणजे पुन्हा एकदा भ्रष्टाचाराला मदत करण्यासारखे आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी घेतलेला निर्णय पक्षश्रेष्ठींना लखलाभ असो. तटकरेंचे काम करायला मला मान्य नाही. म्हणून मी माझ्या पदाचा राजीनामा देत असल्याचे त्यांनी सांगितले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची, मालक श्री. शिवराम बाळाराम धामणे आणि श्री. कृष्णा सजनाजी धामणे व इतर यांची अविभाज्य हिस्याची शेतजमीन मिळकत आमचे अशील श्री. प्रभाकर सजनाजी धामणे आणि श्री. शेखर सजनाजी धामणे यांनी विकत घेण्यासाठी, मिळकतीचे विद्यमान मालक यांचे बरोबर वाटाघाटी केल्या आहेत. सदर मिळकती निर्वेध्य असल्याचा भरवसा मिळकतीचे मालकांनी आमचे अशिलास दिला आहे. सदर मिळकतीबाबत मला 'मालकी हक्काचे प्रमाणपत्र व शोध अहवाल' देण्याचा आहे.

मिळकतीचे वर्णन:- तुकडी व जिल्हा- रायगड, पोटतुकडी व तालुका रोहा, यांचे हद्दीतील मौजे- कोंडगाव, ता.रोहा, जिल्हा. रायगड यांचे हद्दीतील शेतजमीन मिळकत जिचे वर्णन खालीलप्रमाणे:-

अ.नं	गट नं	क्षेत्र हे.आर.पॉ २-४५-०० पैकी	आकार: रु.पै ३.१८ पैकी	मालकाचे नाव
१	४४	१-२२-५	१.५९	श्री. शिवराम बाळाराम धामणे
२	४४	०-८१-६७	१.०६	श्री. कृष्णा सजनाजी धामणे व इतर

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबध, ताबा, मालकी, वहिवाट, बयाना, साठेकारार, लीज, लीएन, चार्ज, बोजा, पोटगीहक्क, डिक्री, तारण, गहान, जाणेयेणेचा व इतर हक्क असल्यास त्यांनी, हक्काचे पृष्ठयार्थ असणाऱ्या सर्व कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कराव्यात, वरील मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास, वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही अथवा असल्यास तो आमच्या अशिलाच्या लाभांत सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. ०६/०४/२०२४ **ॲडव्होकेट : श्री. महेंद्र यशवंत धामणे.**
रा. नागोठणे, रोहा, रायगड.मो.न.९७६७२५०११०

निवडक

मतदानासाठी जनजागृती

रसायनी : मतदारांना जागृत करण्यासाठी राजिप शाळा वडवळ यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. या रॅलीला विद्यार्थी आणि जागृत मतदार यांच्याकडून प्रतिसाद मिळाला. निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे १८९-विधानसभा मतदार संघात अंतर्गत मतदान जनजागृती करिता विविध प्रकारचे उपक्रम राबविले जात आहेत. राजिप शाळा वडवळ यांनीही या उपक्रमात लोकशाही प्रती आपली जबाबदारी डोळ्यासमोर ठेऊन रॅली काढण्यात आली.

संवेदनशील केंद्रे

पनवेल : पनवेलसह मावळ लोकसभा मतदारसंघात दोन हजार ५५६ मतदान केंद्रे आहेत. त्यापैकी १४ मतदान केंद्रे संवदेनशील असून पिंपरी मतदारसंघात ४०० मतदान केंद्रांपैकी सर्वाधिक ६ संवेदनशील केंद्रांचा समावेश आहे; तर कर्जत, उरणमध्ये शून्य संवेदनशील मतदान केंद्रे आहेत. खारघर, पालिदेवद व शिरवली ही तीन संवेदनशील केंद्रे आहेत.मावळ मतदारसंघात सहा तालुके मिळून २५ लाख ९ हजार ४६१ मतदार आहेत. सर्वाधिक संवेदनशील मतदान केंद्रे पिंपरी विधानसभा मतदारसंघात आहेत.

खराब हवामानाची भीती

रसायनी : रसायनी पाताळगंगा परिसरात पाताळगंगा नदीमुळे शेतकऱ्यांना दुबार भातशेती आणि भाजीपाल्याचे पीक घेण्यासाठी फायदा होत आहे. दरम्यान आठ दिवसांपासून हवामानात बदल झाला आहे. तापमानात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. आकाश अंशतः ढगाळ आहे; तर दोन-तीन दिवसांनी राज्यात अवकाळी पावसाची हवामान खात्याने शक्यता व्यक्त केली आहे. या खराब हवामानाची भीती शेतकऱ्यांना सतत सतावत आहे.

‘आचारसंहितेचे पालन करा’

कोलाड : लोकसभा निवडणूकांच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने आचारसंहिता लागू केली आहे. तरी येणाऱ्या सण उत्सव काळात आचारसंहिता पालन करण्याचे आदेश कोलाड पोलीस स पो.नि.नितीन मोहिते यांनी शुक्रवारी (दि.५) शांतता कमिटीत केली. तसेच सर्वांनी सहकार्य करावे,असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी सपोनि नितीन मोहिते, चौधरी, नरेश पाटील, शिंद, आदी पोलीस तसेच परिसरातील सर्व पक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते.

मोबाईल चोरणारा अटक

नेरळ: नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील श्री कृष्णा डेंटल क्लिनिकमध्ये आरोग्य सेविकांचा मोबाईल फोन एका तरुणाने हात चलाखी करून लंपास केला होता. सीसीटिव्ही फुटेज यांच्या माध्यमातून नेरळ पोलिसांनी बदलापूर येथील घरातून सदानंद कोळी याला ताब्यात घेवून त्याच्याकडून वन प्लस कंपनीचा १८ हजार रुपये किमतीचा मोबाईल सह त्या तरुणाला पकडून नेरळ पोलीस ठाणे येथे आणले. तरुणाला मोबाईल चोरी प्रकरणी त्यास अटक केली असून नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

● (छायाचित्र : समीर मालोदे)

दिग्गजांकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगडच्या रणरागिणी, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांच्या निधनाची माहिती मिळताच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि.५) एप्रिल रोजी पेझारी येथे जाऊन पाटील कुटुंबियांची भेट घेतली. मिनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी (दि.२९) निधन झाले. त्यांच्या निधनानंतर पाटील कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेण्यासाठी राजकीय, सामाजिक, अशा वेगवेगळ्या क्षेत्रांमधील दिग्गज मंडळी, पंचक्रोशीतील ग्रामस्थ महिलांची अलोट गर्दी केली होती. गेल्या आठ दिवसांपासून पेझारी येथील सुशीला सदनमध्ये कार्यकर्त्यांची बहरून गेला आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी खा.अनंत गीते यांनी शुक्रवारी पेझारी येथे जाऊन पाटील कुटूंबियांची भेट घेतली. यावेळी आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, ॲड. आस्वाद पाटील, रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, मिनाक्षी पाटील यांच्या स्नुषा चित्रा पाटील, नृपाल पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, सवाई पाटील, सुमन पाटील, राजन पाटील, नीता पाटील, आदी पाटील कुटुंबियांचे सांत्वन केले.

यावेळी आ. भरत गोगावले, आ. महेंद्र थोरवे, माजी आ. विनय नातू, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, संजय पाटील, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भास्कर चव्हाण, भाजपचे तालूका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, चेंढरे ग्रामपंचायत माजी उपसरपंच यतीन घरत, कुर्डूसचे माजी सरपंच संदीप पाटील, व्यवसायिक केशव पुजारी, रायगड बाजारचे उपाध्यक्ष प्रमोद घासे, वेश्वीचे माजी सरपंच प्रफुल्ल पाटील आदी मान्यवर, शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रशासनाच्या डोळ्यात धुळफेक

। पनवेल । प्रतिनिधी ।

कचऱ्याच्या गाडीत माती भरून त्यावर रहिवासी संस्थेमधील कचरा टाकून प्रशासनाच्या डोळ्यात धुळफेक करण्याचे काम पालिका हद्दीत घणकचऱ्याची वाहतूक करण्यासाठी नेमण्यात आलेला कंत्राटदार करत आहे. शेकाप विधानसभा उपाध्यक्ष अजित अडसूळे यांनी या बाबत पालिका अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असून, अडसूळे यांच्या तक्रारीची दखल घेत योग्य ती कार्यवाही करण्याचे संकेत अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

घंटागाडीत माती भरून त्यावर कचरा

पनवेल पालिका हद्दीत दररोज तयार होणाऱ्या घनकचऱ्याची वाहतूक करण्यासाठी पालिका प्रशासनाने ५४ घंटागाड्या तसेच १५ कोपॅक्टरची खरेदी केली आहे. या वाहनांची देखभाल आणि वाहतूक करण्यासाठी प्रशासनातर्फे नोव्हेंबर २०२३ रोजी नव्या कंत्राटदाराची नेमणूक केली.पालिका हद्दीत दररोज ४०० ते साडेचारशे टन घनकचरा निर्माण होत असून, या कचऱ्याची वाहतूक आणि विल्हेवाट लावण्यासाठी प्रसासनातर्फे कंत्राटदार कंपनीला प्रतिटन २ हजार एकशे ९९ इतका दर देण्यात येतो. याचाच फायदा उचलण्यासाठी कंत्राटदाराने नेमलेली माणसे पालिका हद्दीत रस्त्याच्याकडेला जमा केलेली माती घंटागाडीत भरतात. मातीमुळे कचऱ्याचे वजन वाढत असल्याने माती मिश्रित कचरा भरूण कंत्राटदार कंपनी पालिकेची आर्थिक फसवणूक करत असल्याचा आरोप अडसूळे यांनी केला आहे.

> **सफाई दरम्यान, रस्त्यावर गोळा होणाऱ्या मातीची वाहतूक कंत्राटदार करत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे. या पुढे असे प्रकार घडू नये या करता योग्य उपाय योजना राबवण्याच्या सूचना कंत्राटदाराला करण्यात येणार आहेत.**
>
> **– वैभव विधाते**
> **उपायुक्त पनवेल पालिका.**

कर्जतमध्ये टँकर सुरु करण्याची मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात यावर्षी ६० आदिवासीवाड्या आणि १८ गावे पाणीटंचाईग्रस्त आहेत. या सर्व ठिकाणी पिण्याचे पाणी टँकरच्या माध्यमातून पुरविण्यासाठी पाणीटंचाई कृती आरखडा तयार करण्यात आला आहे. मात्र, पाणीटंचाई वाढल्याने यावर्षी दोन एप्रिला पहिला पाणी टँकर शासनातर्फे सुरु करण्यात आला. दरम्यान, आणखी चार गावे वाड्यामध्ये टँकर सुरु करण्याची मागणी पंचायत समितीकडे करण्यात आली आहे.

तालुक्यातील ५५ ग्रामपंचायतीत पिण्याच्या पाण्याची स्थिती लक्षात घेऊन जानेवारी २०२४ मध्ये कर्जत पाणीटंचाई निवारण कृती आराखडा तयार करण्यात आला. त्यावेळी आमदार, तहसीलदार, गटविकास अधिकारी, पाणीपुरवठा अभियंता यांच्या उपस्थितीत चर्चा करून पाणीटंचाई कृती आराखड्यात करण्यात आला. सर्व ठिकाणी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी ५१ लाखाची तरतूद करण्यात आली. मात्र, यावर्षी होळीनंतर उष्म्यात वाढ झाल्यामुळे, तालुक्यात शासनाचा पहिला टँकर सुरु करण्यात आला.

आषाणे गावात २ एप्रिलला पहिला टँकर सुरु झाला. शासनाचा पहिला टँकर सुरु झाल्यानंतर तालुक्याच्या अन्य भागातून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी मेचकरवाडी, पिंगळस, जांभुळवाडी, धामणी या ठिकाणी शासनाचे पाणी टँकर सुरु करण्याचे प्रस्ताव ग्रामपंचायतीकडून करण्यात आले. सर्व प्रस्ताव नुसार वाड्या आणि गावांमध्येभूजलसर्वेक्षणकरुनत्यांनुसार ट्रॅकर सुरु करण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

> **सध्या एक टँकर आला आहे, पण आणखी टँकर येणार असून या सर्व टँकरमध्ये जिपीआरएस प्रणाली लागू केली आहे. त्यामुळे टँकर ठरवून दिलेल्या गावे वाड्या येथे वेळेवर पोहचतो की नाही हे पाहता येणार आहे.**
>
> **–गोवर्धन नखाते.**
> **कर्जत पंचायत समिती**

बटाट्याच्या शेतीचा यशस्वी प्रयोग

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील शेतकरी पावसाळा संपला की, कडधान्याची शेती करतात. जमिनीमधील ओलाव्यावर केल्या जाणाऱ्या कडधान्य शेतीला पर्याय म्हणून बटाट्याची शेती समोर आली आहे. तालुक्यातील तीन शेतकऱ्यांनी हा प्रयोग केला असून बटाट्याच्या शेतीचा प्रयोग यशस्वी झाला असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

कर्जत तालुका भाताचे कोठार म्हणून ओळखले जाते. त्यात शेतकऱ्यांना भात पिकानंतर नगदी पिकांकडे कसे नेता येईल याकडे कृषी विभाग सातत्याने प्रयत्नशील असतो. कळंब येथील पांडुरंग बदे, पोशीर येथील भारत हाबळे, अनिल जोशी या शेतकऱ्यांनी बटाट्याची नाविन्यपूर्ण लागवड करून एक पाऊल पुढे टाकले. पोशिर येथील शेतकरी अनिल जोशी यांनी बटाटा लागवडीचा प्रयोग हा भात पिकानंतर कडधान्यावर अडकून पडलेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांना पर्याय देणे व त्याचबरोबर प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न खाद्य प्रक्रिया उद्योग यामधून बटाट्याची शेती करण्याचा प्रयोग केला आहे.

> **शेतकऱ्यांना कडधान्य शेतीला आणखी एक पर्याय मिळाला आहे. बटाटा पिकाची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्सहन म्हणून पुढील वर्षी चांगले बियाणे कृषी विभाग यांच्याकडून उपलब्ध करून दिले जाईल.**
>
> **–अशोक गायकवाड,** कृषी अधिकारी

मद्यविक्री करणाऱ्यांवर करडी नजर

पनवेल : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व हॉटेल व्यावसायिक व मद्यविक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर आत्ता निवडणूक आयोगाद्वारे पुरवठा साखळी व्यवस्थापन ॲप सुरु करण्यात आले आहेत. या ॲपमध्ये दररोजची मद्य खरेदी व विक्रीची माहिती संबंधित व्यावसायिकांना द्यावी लागणार असल्याने यापुढे मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी मद्याचा महापूर व वाटप कुठल्याच पक्षाला करता येणार नाही. सर्वच हॉटेल व मद्यविक्री करणाऱ्या व्यावसायिकांना आत्ता सप्लाय चैन मॅनेजमेंट ॲपद्वारे दैनदिन मद्य खरेदी व विक्रीची माहिती द्यावी लागणार आहे. व या माहितीवर राज्य निवडणूक आयोग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे लक्ष राहणार आहे.

शहाबाज वाचनालयाचा वर्धापनदिन

। अलिबाग । वार्ताहर ।

शहाबाज सार्वजनिक वाचनालय आणि ग्रंथालयाचा १०८ वा वर्धापनदिन बुधवारी (दि.३) उत्साहात पार पडला. या निमित्ताने वाचनालयाच्या नूतन वास्तूचे उद्‌घाटन वाचनालयाच्या आजी-माजी अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन, सरस्वतीपूजन आणि ग्रंथपूजन करण्यात आले.

शहाबाज सार्वजनिक वाचनालय आणि ग्रंथालयाचा १०८ वर्षे झाल्याने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रास्ताविकात वाचनालयाला लाभलेला समृद्ध वारसा, १०८ वर्षांची परंपरा आणि त्यामध्ये झालेले अनेक बदल सांगण्यात आले. यावेळी सलग पाच वर्षे कार्य केलेल्या माजी समिती सदस्यांचा गौरव करण्यात आला. तसेच या अहवाल वर्षांमध्ये ज्या देणगीदारांनी सढळ हस्ते पुस्तक अथवा आर्थिक मदत केले, अशा मान्यवरांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात समीर पाटील आणि नितीन म्हात्रे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात नितीन पाटील यांनी घेतलेला वारसा पुढे चालवत आपल्या नवीन योजनांची मांडणी केली. तसेच वाचनसंस्कृती टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे सांगून नवीन समितीमार्फत वाचकवृद्धी यशस्वी करण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमाला वाचनालयाचे अध्यक्ष नितीन पाटील, मंगेश भगत, निवृत्ती पाटील, मारुती बैकर यांच्यासह वाचनालयाचे सर्व समिती सदस्य, ग्रंथालय, कर्मचारी, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रगती पाटील यांनी; तर आभारप्रदर्शन प्रशांत पाटील यांनी केले.

आर्मी स्कूलमध्ये प्रवेश सुरू

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील विजय आर्मी स्कुल ॲन्ड जुनिअर कॉलेज, चिखले येथे प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इयत्ता सातवी ते इयत्ता १२ वीसाठी ओबीसी आणि खुल्या संवर्गातील काही रिक्त जागांसाठी प्रवेश सुरू आहे. सहावी व सातवीसाठी प्रवेश पूर्व परीक्षा रविवारी (दि. ७) सकाळी ९.३० वाजता होणार आहे. अनिवासी विद्यार्थ्यांनाही प्रवेश घेता येणार आहे. अकरावी विज्ञानसाठी ऑफलाईन प्रवेश नोंदणी सुरू आहे. अधिक माहितीसाठी एम. के. मराठे ९८६७३०१७२५, डी. एन. गावंड ९८६७१२१९६२ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

रणत्या उन्हात जणू रंगांची उधळण

चैत्राच्या अगमनाने बहरली रंगीबेरंगी फुले

। पाताळगंगा । वार्ताहर ।

रणरणत्या उन्हामध्ये झाडा- वेलींना आलेल्या विविध प्रकारच्या फुलांमुळे निसर्गाच्या सौंदर्य सृष्टीत भर घालली जात आहे. चैत्राच्यात अगमनाने जणू ही फुले बहरली असून रणरणत्या उन्हात ही फुले रंगांची जणू उधळण करीत आहे की काय? असा भास प्रवास करीत असलेल्या वाटसरु यांना जाणवू लागले आहे.

वृक्ष-वेलींवर आलेली चमकदार रंगाची सुंदर फुले बहरली असून चैत्र महिन्यामध्ये याच वृक्षांना बहार येत असल्यामुळे मनाला एक प्रकारचा आनंद देत असतात. उष्ण व दमट वातावरणात चांगली वाढ होत असल्यामुळे शेताच्या बांधावर रस्त्यांच्या कडेला अशा विविध ठिकाणी ही फुललेले फुले विविध भागात आढळून आहे.

सध्या उन्हाळा असल्याने ही झाडे सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. यामुळे फुलांचा टवटवीतपणा असतो. तर काही फुलांना गंध नसला तरीही त्याचे सौंदर्य मनाला भुरळ घालत असतात. अशी नानाविध जातीची फुले चैत्र व वैशाखात बहरतात. हिरव्यागार पानातून डोकावणारे फुले स्वत:च्या वेगळेपणाची साक्ष देत असतात, याची अनुभूती तालुक्यांच्या ठीकाणी पहावयास मिळत आहे.

चैत्राच्या उन्हाने होरपळणाऱ्या जिवांना एखाद्या हिरव्यागर्द वृक्षांचे दर्शन होणे, त्यातच हिरव्या पानांतून लालचुटूक फुललांचे डोकावणे मनाला आनंदी करते. सृष्टीवर इतर वृक्षांची पानगळ होत असतानाच काही झाडे मात्र आपले अस्तित्व सांभाळून असतात. पाने, फुले याच दिवसात बहरुन येतात. कुठे एखाद्या उजाड डोंगरमाथ्यावर हरवलेले एखादे रान फूल नजर वेधून घेते. या उन्हाच्या छोटेसे फूल कसे बरे टवटवीत आहे? असा विचार मनाला पडतो. निसर्गाची ही किमया उन्हाळ्यात अनेक फुलांच्या बाबतीत पहावयास मिळत आहे.

कलिंगडांची आवक घटली

। रसायनी । वार्ताहर ।

वासांबे मोहोपाडा येथील बाजारपेठेत स्थानिक कलिंगडांची आवक घटली आहे. त्यामुळे बाजारात देशावरील कलिंगडाचे भाव वधारल्याने खरेदी करताना नागरिकांचे तोंडचे पाणी पळत आहे.सध्या उकाडा जास्त असल्याने कलिंगडाला मागणी वाढत आहे. वासांबे मोहोपाडा येथील बाजारात देशावरील, तसेच कर्जत, पेण तालुक्यातील स्थानिक शेतकऱ्यांच्या कलिंगडांची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. येथील कलिंगड स्वस्त आणि गोड असल्याने त्याला चांगली मागणी आहे. सुमारे दहा रुपये किलोचा भाव मिळत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

कुत्र्यावरून हाणामारी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पाळीव कुत्र्यावरून दोन गटात हाणामारी झाले. त्यामध्ये दोन्ही गटातील जखमी झाले आहेत. ही घटना सोमवारी सायंकाळी वरंडेपाडा येथे घडली.याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात एकमेकांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वरंडेपाडा येथील पहिल्या फिर्यादी महिलेची कोंबडी शेजारच्या पाळीव कुत्र्याने पकडली होती. त्यावरून फिर्यादीच्या नातेवाईकांनी दगड मारून त्या कुत्र्याला हाकलून दिले. यावरून आरोपी व फिर्यादीमध्ये शाब्दीक वाद झाले.

राागाच्या भरात आरोपीने फिर्यादीला काठीने मारहाण केले. तसेच त्यांचे पती व अन्य दोन जणांनीदेखील दांडक्याने मारहाण करून जखमी केले.

तसेच दुसऱ्या फिर्यादी त्यांचा कुत्रा आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपीने काठीने फिर्यादी यांच्या नातेवाईकाला मारहाण केली. लाकडी दांडक्याने अन्य जणांना जखमी केले. ही घटना सोमवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास वरंडेपाडा येथे घडली. याप्रकरणी पोलीस नाईक गव्हाणे, पोलीस नाईक सचिन वाघमारे अधिक तपास करीत आहेत.

वरंडेपाडा येथील घटना

नामांतराची उठाठेव

राहुल नार्वेकर हे विधानसभेचे अध्यक्ष आहेत. हे पद घटनात्मक आहे. विधिमंडळाच्या आवारात त्यांचाच शब्द चालतो. विधानसभेत त्यांनी दिलेल्या निर्णयांना न्यायालयात देखील अपवादात्मक स्थितीतच आव्हान देता येते. अशा पदावरील व्यक्तीने क्षुद्र राजकारण करू नये व सदैव आपल्या पदाचा आब राखून राहावे अशी अपेक्षा असते. तरच विधिमंडळातील त्यांच्या अधिकाराबाबत लोकांना दरारा वाटू शकतो. नार्वेकरांनी ही अपेक्षा अनेकदा धुळीला मिळवलेली आहे. एकनाथ शिंदे फुटीनंतर ठाकरे गटाचा अर्ज त्यांनी बराच काळ सुनावणीसच घेतला नाही. त्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने त्यांना कडक शब्दात झापले. तरीही त्यांनी वेळकाढूपणा करण्याचा प्रयत्न केला आणि शेवटी कोणीच आमदार अपात्र नाही व सेनेचे दोन्ही गट वैध असा अजब निर्णय दिला. त्यातही निर्णय देण्याच्या आदल्या दिवशी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली व आमदार म्हणून मागण्या मांडण्यासाठी आपण भेटलो असा हास्यास्पद खुलासा केला. या नार्वेकरांनी आता अलिबागचे नामांतर करा अशी मागणी केली आहे. नार्वेकरांचे कुटुंब मूळचे अलिबागजवळचे असले आणि त्यांचा जमीनजुमला येथे असला तरी त्यांचा अलिबाग वा रायगडच्या समाजकारणाशी काहीही संबंध नाही. त्यांचे सर्व राजकारण मुंबईच्या कुलाबा मतदारसंघात घडले आहे. तरीही त्यांनी ही नामांतराच्या मागणीची नस्ती उठाठेव केली आहे. नार्वेकरांना दक्षिण मुंबई लोकसभेतून शिंदे गटाची किंवा थेट भाजपचीच उमेदवारी दिली जाईल अशी चर्चा आहे. त्यामुळे नार्वेकरांची राजकीय जमवाजमव चालू आहे. अखिल भारतीय भंडारी समाज महासंघाने नार्वेकरांना या नामांतराचे पत्र दिले व ती मागणी उचलून धरून नार्वेकरांनी लगोलग मुख्यमंत्र्यांना तसे पत्र पाठवले. अलिबागचे नाव मायनाक भंडारी यांच्या नावावरून ठेवा आणि त्यांचे स्मारक उभे करा असे या पत्रात म्हटले आहे. ही मागणी तशी जुनी आहे. पण आता तिचा राजकीय उपयोग करण्याचे चालले आहे.

राजकीय हेतू

भंडारी समाजाची मते मिळतील अशा आशेने नार्वेकरांनी हा उद्योग केलेला दिसतो. पणजनता ही राजकीय नेत्यांपेक्षा अधिक शहाणी व जबाबदार असते. तिला आपले रोजचे रोजीरोटीचे प्रश्न अधिक महत्वाचे असतात. आता नार्वेकरांनी थेट शिंदे यांच्याकडेच ही मागणी केल्याने तिचे गांभीर्य वाढल्याचा भास होणार आहे. पण तो भासच असेल. या मागणीच्या आधारे काही जण आपले दुकान पुढे रेटतील. अलिबागच नव्हे तर कोणत्याही गावाच्या इतिहासाशी या मंडळींचा काहीही वास्ता नसतो. त्यात एखादे मुस्लिम नाव आहे याखातर ते त्याला विरोध करतात व आपल्या समाजातील नेत्याच्या नावाचा आग्रह धरतात. त्यातून मग हा विनाकारण अस्मितेचा व संवेदनशील विषय बनतो. अलिकडे याच रीतीने अहमदनगरचे नामांतर झाले. अहमदनगर जिल्ह्यातील चौंडीमध्ये अहिल्याबाई होळकरांचा जन्म झाला हे खरे आहे. मात्र त्यांचे कर्तृत्व फुलले ते इंदूर व ग्वाल्हेरच्या भूमीत. नगरच्या नावातील अहमद किंवा नगरचा पूर्वीचा शासक निजाम हे काही क्रूरकर्मे किंवा जनतेला लुटणारे वगैरे नव्हते. उलट त्यांनी अनेक लोकोपयोगी गोष्टी केल्याचे पुरावे आहेत. त्यामुळे निव्वळ मुस्लिम असल्यास्तव ते नाव बदलायला हवे हा मुस्लिमद्वेष्टेपणा झाला. पण नरेंद्र मोदींच्या भाजपला हा मुस्लिमांचा द्वेष सर्व समाजात रुजवायचा आहे. त्यासाठी ते शहरांची नावे बदलणे, मशिदींच्या जागी मंदिरे बांधणे असले उद्योग करीत आहेत. सुदैवानेरायगड जिल्ह्याला या राजकारणाचा आजवर स्पर्श झालेला नाही. भाजपच्या या विद्वेषी व विध्वंसक कारस्थानांना इथे थारा मिळालेला नाही. नार्वेकरांसारख्या नेत्यांनी या राजकारणाचा पुरस्कार करावा हे दुर्देवी आहे.

जनता सूज्ञ आहे

नार्वेकरांच्या या राजकारणाला कान्होजीराजे आंग्रे यांचे वंशज रघुजीराजे व माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी चांगले प्रत्युत्तर दिले आहे. अलिबागचे नाव बदलण्याची अजिबात गरज नाही असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. मायनाक यांचे नाव कोणी पुढे केले तर कान्होजीराजे आंग्रे यांचे का नको असा प्रश्न उभा राहणार आहे. मग अन्य मंडळी विशिष्ट समाजांच्या वा पक्षांच्या नेत्यांची नावे घेऊन मागण्यांच्या शर्यतीत उतरतील. अहमदनगरमध्ये हेच झाले. तेथे शहाजीराजांचे गुरु मलिक अंबर यांचे नाव का नको असा प्रश्न उपस्थित झाला व तो रास्त आहे. कारण निजामाच्या पदरी असलेल्या अंबर याने ज्या रयतवारी तसेच इतर राज्यकारभाराच्या पध्दतींचा पुरस्कार केला तो शिवाजीराजांनाही मार्गदर्शक ठरला ही वस्तुस्थिती आहे. मायनाक भंडारी यांचे कर्तृत्व मोठेच आहे. ते किंवा इतिहासातील सर्वच लढवय्यांविषयी सगळ्या लोकांना आदर आहे. त्यांचे यथायोग्य स्मारकही उभे राहायलाच हवे. मात्र एखाद्या शहराच्या नावबदलाची टूम काढून त्यात या लढवय्यांना मरणोत्तर झुंजायला लावणे हा त्यांचा अपमानच होय. त्यातही आपले इतिहासप्रेम इतरांपेक्षा अधिक कडवे आहे हे दाखवण्यासाठी अशा नावांमध्ये त्या त्या व्यक्तींच्या सर्व उपाध्या समाविष्ट व्हाव्यात असा आग्रह धरला जातो. तो हास्यास्पद ठरतो व ती नावे रुढ होत नाहीत. मुंबईच्या मलबारहिलजवळील भुयारी मार्गाचे नाव तर स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजीमहाराज रस्ता असे आहे. हे नाव कोणीही कधीही उच्चारणार नाही व ते कागदोपत्रीच केवळ पडून राहील. शहरांच्या नावबदलांमुळे सरकारी व खासगी कार्यालये यामधील सर्व कागदपत्रे तसेच दुकानांच्या पाट्या इत्यादी बदलण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो. हा केवळ अनाठायी असतो. हाच खर्च करून शिवकालीन किल्ले व इतर स्मारकांचे चांगल्या रीतीने जतन केले गेले तर अधिक भले होईल. पण त्यासाठी विशिष्ट दृष्टी असावी लागते. अभ्यास व कष्ट करावे लागतात. ते करण्यापेक्षा असल्या मागण्या करून लोकांच्या भावना भडकावणे अधिक सोपे असते. थोडक्यात, शहरांची वा ठिकाणांची नावे बदलणे हा फालतू पण उपद्रवी राजकारणाचा नमुना आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, काही जण अशी निमित्ते शोधत असतातच. पणसूज्ञ अलिबागकर अशा राजकारणाला बळी पडणार नाहीत.

विचार

गुंतवणूकविश्वात रुजतेय कृत्रिम प्रज्ञा

तंत्रज्ञानाधारित वित्तीय कंपन्यांचे कृत्रिम बुद्धिमत्ता यंत्रणेशी जोडलेले रोबो सल्लागार आता बऱ्यापैकी रुळले आहेत. या माध्यमातून संशोधन आणि संख्यात्मक विश्लेषणाद्वारे पुढे आलेला सल्ला खात्रीशीर असल्याने गुंतवणुकीबाबत निर्णय घेताना कृत्रिम बुद्धिमत्ता उपयुक्त ठरते. यांत्रिक प्रणालीला गुंतवणूकदाराची जोखीम घेण्याची क्षमता, गुंतवणूक मूल्य, कालावधीची माहिती देऊन पर्याय सुचवले जातात. या प्रकारे गुंतवणूकविश्वात कृत्रिम प्रज्ञा रुजत आहे.

हेमंत देसाई

शेअर बाजारात सध्या अनेक कंपन्या आयपीओच्या माध्यमातून सूचीबद्ध होत आहेत. आयपीओमध्ये मेन किंवा मुख्य बोर्ड आणि एसएमई विभागाचा समावेश असतो. एसएमई म्हणजेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विभागातील कंपन्यांच्या किंमतीमध्ये गडबडी होत असल्याचे सेबीच्या लक्षात आले आहे. ठोस पुरावे मिळाले की त्यानुसार सेबी कारवाई करणार आहे. तसेच एसएमई कंपन्यांच्या आयपीओबाबत अधिक कठोर निकष लागू केले जाणार आहेत, अशी माहिती सेबीच्या अध्यक्ष श्रीमती माधवी पुरी बुच यांनी दिली आहे. १ मार्च २०२३ ते २९ फेब्रुवारी २०२४ या एक वर्षात बेंचमार्क सेन्सेक्समध्ये २२ टक्क्यांची वाढ झाली. परंतु बीएससी मिडकॅप आणि स्मॉल कॅप निर्देशांकात अनुक्रमे ६३ टक्के आणि ६५ टक्क्यांची, म्हणजे तिपटीने वाढ झाली तर बीएससी एसएमई आयपीओ निर्देशांकात १४१ टक्क्यांची वृद्धी झाली. शेअर बाजारात ज्या गतीने वाढ होत आहे, त्याच्या आसपास गतीने हे इतर निर्देशांक वाढले असते तर नैसर्गिक म्हणता आले असते. परंतु ही मिडकॅप आणि एसएमईजमधील तेजी अनैसर्गिक म्हणावी लागेल. शेअर बाजारात ज्या कंपन्यांच्या उत्पन्नाच्या तुलनेत जास्त प्रमाणात भाव असतो, तिथे धोका दडलेला असू शकतो. याचे कारण बाजाराची पडझड होते तेव्हा अशा कंपन्यांची घसरण त्यापेक्षाही अधिक पटींनी होते आणि गुंतवणूकदार अशा वेळी संकटात सापडतात. शेअर बाजारात अनेकदा कंपन्या दलालांच्या आणि वित्तसंस्थांच्या मदतीने भावांमध्ये कृत्रिम पद्धतीने वाढ आणि घट घडवून आणतात, हा इतिहास आहे. एका मर्यादेपलीकडे भाव वाढतात किंवा घसरतात, तेव्हा सर्किट लावले जाते. परंतु भावांमधील संशयास्पद गडबड गोंधळावर बारकाईने लक्ष ठेवणे,हे सेबीचे कर्तव्य आहे.

आयपीओ असो अथवा बाजारात आधीच सूचीबद्ध झालेला शेअर असो, त्याच्या भावामध्ये कशा पद्धतीने चढ-उतार होत आहे, हा पॅटर्न काही दिवस अभ्यासून सेबी पुरावे गोळा करते. त्या पुराव्याच्या आधारावर केस तयार करून कारवाई केली जाते. काही एसएमईजच्या कंपन्या सूचीबद्ध होताना मॅनिप्युलेशन झाल्याच्या तक्रारी सेबीकडे आल्या आहेत. छोट्या कंपन्यांच्या भावांमध्ये कृत्रिमपणे हेराफेरी करणे अधिक सोपे असते. कारण या कंपन्या लहान असतात आणि त्यांचे मार्केटही चिमुकलेच असते. फ्लोटिंग स्टॉक थोडा असतो. २०२३ मध्ये १८२ एसएमई कंपन्यांचे आयपीओ आले. त्यामधून ४,६०० कोटी रुपयांचे भांडवल उभारण्यात आले. २०२२ पेक्षा हे प्रमाण १५० टक्क्यांनी अधिक होते. २०२४ मध्ये पहिल्या दोन महिन्यांमध्येच ३० एसएमई कंपन्यांचे आयपीओज आले आणि एक हजार कोटी रुपये भांडवलाची उभारणी केली. बाजारमूल्य ५,००० कोटी रुपयांपेक्षा कमी असणाऱ्या कंपन्या स्मॉल कॅप आणि पाच हजार ते २० हजार कोटी रुपयांच्या कक्षेत असणाऱ्या कंपन्या मिडकॅप मानल्या जातात. ऑगस्ट २०२३ ते जानेवारी २०२४ या काळात स्मॉल कॅप फंडांमध्ये २२ हजार कोटी रुपये तर मिडकॅप फंडामध्ये १३,००० कोटी रुपये आकर्षित झाले. ही रक्कम काही छोटी नाही आणि ती लहान लहान गुंतवणूकदारांची आहे. त्यामुळे त्यांचे रक्षण करणे, हे सेबीचे कर्तव्य आहे. कदाचित म्हणूनच या बाबतीत जास्त दक्षता बाळगली जात असून एकूणच व्यवहारांमध्ये उत्तम पारदर्शकता रहावी, यासाठी सेबी महत्वपूर्ण पावले उचलत आहे.

शेअर बाजार सध्या चांगलाच तेजीत आहे. सेन्सेक्स असो वा निफ्टी, निर्देशांक नवी उच्चांकी पातळी गाठत आहे. २०२४ मध्ये पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार येईल आणि देशात स्थिर स्थिर राजवट असेल, अशी आशा व्यापारी, कारखानदार, आयातदार-निर्यातदार, दलाल आणि देशी-विदेशी गुंतवणूकदारांना वाटत आहे. नवनवीन गुंतवणूकदार बाजाराकडे खेचले जात असून देशातील डिमॅट खात्यांची संख्या १३ कोटींच्या पुढे जाऊन पोहोचली आहे. परंतु त्याच वेळी फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. अलिकडेच बँक ऑफ इंग्लंडकडून व्याजदर कपातीबाबत सकारात्मक संदेश संकेत दिले गेले असून अनुकूल जागतिक संकेतामुळे भांडवली बाजार उत्साहात आहे, हे खरे आहे. आर्थिक विकासदरही अपेक्षेपेक्षा जास्त असल्याचा दावा केला जात आहे. मार्च महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात मिड कॅप आणि स्मॉल कॅप फंडांमध्ये डिसेंबर २०२२ नंतर सर्वाधिक घसरण अनुभवास आली. या काळात लार्ज कॅप निर्देशांकात तीन टक्क्यांची घसरण झाली असताना स्मॉल आणि मिडकॅप निर्देशांकांमध्ये मात्र अनुक्रमे साडेपाच टक्के आणि ४.५६ टक्के इतकी घसरण दिसून आली. या पार्श्वभूमीवर सेबीचे पूर्ण वेळ सदस्य कमलेशचंद्र यांनी भांडवली बाजारातील हेराफेरीपासून सावध रहा आणि दलालांवर लक्ष ठेवा, असे आवाहन केले आहे. गेल्या अडीच वर्षांमध्ये देशातील गुंतवणूकदारांची संख्या दुपटीने वाढली आहे आणि गेल्या वर्षभरात डिमॅट खात्यांमध्ये २० टक्क्यांची भर पडली आहे. परंतु गुंतवणूकदारांच्या विश्वासाला तडा गेला तर एकाच दिवसात होत्याचे नव्हते होऊन जाते. त्यामुळेच शेअर बाजारावर नजर ठेवण्यासाठी सेबी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली वापरत आहे.

तंत्रज्ञानाधारित वित्तीय कंपन्यांनी वापरात आणलेले रोबो सल्लागार आता बऱ्यापैकी रुळले आहेत. ते कृत्रिम बुद्धिमत्ता यंत्रणेशी जोडलेले असतात. ते कंपनीच्या समभागाची भूतकाळातील कामगिरी आणि विविध गुणोत्तरांचा अभ्यास करून गुंतवणूकदारांना भविष्यातील अपेक्षित कामगिरीची सूचना देत असतात. रोबो अर्थात यंत्राच्या माध्यमातून संशोधन आणि संख्यात्मक विश्लेषणाद्वारे पुढे आलेला सल्ला हा खात्रीशीर असतो. या शिवाय व्यापारी किंवा ट्रेडर्सना भांडवली बाजारातील गुंतवणुकीबाबत निर्णय घेण्यासाठी ऐतिहासिक आकडेवारी आणि विविध खरेदी-विक्री प्रारूपांचे विश्लेषण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता उपयुक्त ठरते. शेअरखान, निओ, एंजेल ब्रोकिंग एआरक्यू किंवा फाइव्ह पैसा यासारख्या आघाडीच्या दलाली पेढ्या निर्धारित केलेली बाजार रणनीती आणि बाजारातील कल बघून स्वयंचलितपणे गुंतवणूक योजनांची रीत (अर्थात 'अल्गोरिदम') वापरतात. त्यासाठी 'एआय' उपयुक्त ठरते. सामान्य गुंतवणूकदाराच्या दृष्टीने पहायचे झाल्यास रोबो सल्लागाराला म्हणजेच यांत्रिक प्रणालीला गुंतवणूकदाराची इत्थंभूत माहिती दिली जाते. यामध्ये त्याची जोखीम घेण्याची क्षमता, गुंतवणूक मूल्य, गुंतवणूक कालावधी आदी माहितीच्या आधारे गुंतवणुकीचे निर्णय घेतले जातात अथवा सुचवले जातात. याला गुंतवणूकदारांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

शेअर बाजारात 'एआय'च्या अर्थात रोबोच्या सल्ल्याने समभाग खरेदी-विक्रीचे व्यवहार करताना समभागाची खरेदी आणि विक्री कोणत्या किमतीला अथवा पातळीला करायची हे संगणकीय पद्धतीने आधीच ठरलेले असते. यामुळे संगणकाद्वारे खरेदी-विक्रीचे व्यवहार स्वयंचलितपणे कार्यान्वित केले जाऊ शकतात. शिवाय गुंतवणूकदारांना याच पद्धतीने अतिलोभावर नियंत्रण राखणेदेखील शक्य होते. तिथे भावनेला स्थान नसते. दुसरा मुद्दा आर्थिक शिस्तीचा. भांडवली बाजारात व्यवहार करताना आर्थिक शिस्त महत्त्वाची असते. बाजारात नुकसान होण्याची भीती किंवा थोडा अधिक नफा मिळवण्याची इच्छा यासारख्या भावनिक कारणांमुळे अनेकदा शीस्त मोडीत निघण्याची भीती असते; मात्र ऑटोमेटेड ट्रेडिंग ही शिस्त राखण्यास मदत करते. याशिवाय वेळेची बचत होते. सेकंदा-सेकंदाला कोट्यवधींचे व्यवहार होऊन बाजारात समभागांची किंमत सारखी बदलत असते. काही नॅनो सेकंदांचा विलंबदेखील नफ्यावर परिणाम करू शकतो. अशा वेळी 'एआय' प्रणालीचा वापर खूप फायदेशीर ठरतो. जागतिक पातळीवर अनेक देशांमध्ये हे तंत्रज्ञान अतिशय प्रगत असून अनेक गुंतवणूकदार त्याकडे आकर्षित होत आहेत. उदाहरणार्थ, अमेरिकेत शिकागोस्थित न्यूरेन्सिकचे व्यवहार आकृतिबंधाचे विश्लेषण करणारे मंच आणि सिएटल येथे मुख्यालय असलेले केवूटचे 'के-स्कोअर' हे डेटा विश्लेषण मंच 'एआय'च्या वापरातून समभागांच्या खरेदी-विक्रीचे निर्णय घेतात. भारतातील रोबो-सल्लागार अद्याप प्राथमिक टप्प्यावर आहेत. इथे ते अजून तरी तितकेसे लोकप्रिय झालेले नाहीत.

आजकाल

लोकांची बचत घटत चालली आहे

संजीव चांदोरकर

भारत देशांतर्गत बचती मध्ये आत्मनिर्भर करूया असे का म्हटले जात नाही ? प्रश्न तर विचारा !

जीडीपी वाढ / सेन्सेक्स वाढीचे ढोल वाजवताना मोदी राजवटीतील एका क्षीण आवाजाकडे शासनकर्त्यांनी दुर्लक्ष करणे साहजिक आहे; पण जमिनीला कान लावले कि तो आवाज ऐकू येतोच

तो आवाज आहे देशातील ढासळत्या वित्तीय बचतीच्या प्रमाणाचा रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार देशातील कुटुंबांनी वित्तीय मत्तांमध्ये (फायनान्शियल ॲसेट्स) केलेल्या बचती जीडीपीच्या ५.१ टक्क्यांवर घसरल्या आहेत ;

हि टक्केवारी गेल्या ५० वर्षातील निच्चांक आहे ; इतना सन्नाटा क्यू है भाई !

प्रत्येक कुटुंब काहीबाही बचती करते ; त्यात मुख्यतः दोन प्रकार असतात ; एक म्हणजे फिजिकल ॲसेट्स (घरे , सोने, वाहने इत्यादी) आणि दुसरा फायनान्शियल ॲसेट्स (बँकेतील ठेवी, म्युच्युअल फंड, इत्यादी)

फायनांशियल ॲसेट्स जीडीपीशी टक्केवारी दरवर्षी घसरत आहे

वित्तवर्ष
२०२१: ११.५%
२०२२: ७.२%
२०२३: ५.१%

आणि त्याचवेळी कुटुंबाच्या डोक्यावरील कर्जाची टक्केवारी मात्र वाढत आहे

२०२२: ३.८ % जीडीपीच्या
२०२३: ५.८ % जीडीपीच्या

हि झाली देशाची सरासरी

देशात अती श्रीमंत वर्गापासून दोन वेळच्या खाण्याची मारामार असणाऱ्या वर्गाची भलीमोठी उतरंड आहे हे आपण जाणतोच ; ज्यात गरीब / निम्न मध्यमवर्गीयांचे अनेक विपरीत / रक्तरंजित निर्देशांक श्रीमंत / उच्च वर्गाच्या आकड्यांच्या झगमगीत झग्यात लपून जातात

कुटुंबाच्या बचती आणि कुटुंबाच्या डोक्यावरील कर्जे यांची आकडेवारी खणून काढली कि सारे चित्र स्पष्ट होईल.

गैरसोयीच्या आकडेवारी सार्वजनिक व्यासपीठांवर फारशा हायलाईट करायच्या नाहीत हे मोदी राजवटीचे सूत्र आहे ; पण त्यातून बऱ्याच अंतर्दृष्टी मिळतच असतात.

कुटुंबे मासिक / वार्षिक मिळकती कमवतात ; त्यातून खर्च करतात आणि उरलेल्या पैशाच्या बचती करतात ; गेल्या अनेक वर्षात

कुटुंबाच्या मिळकती / जो मदर सोर्स आहे कमी झाला आहे

खर्च वाढले आहेत ; दोन कारणांमुळे ; एक महागाई आणि दोन कर्जाची परतफेड / ईएमआय इत्यादी

त्याचा परिणाम कुटुंबांच्या बचती कमी होण्यात झाला आहे

कुटुंबांची खरेदी आणि त्यातून वाढणारे कॉर्पोरेट क्षेत्राचे विक्रीचे आकडे हे प्रायः कर्ज काढून खरेदी केल्यामुळे आहेत ; क्रेडिट कार्ड्स , विना तारण , विना कारण कर्जे , बाय नाऊ पे लेटर इत्यादी

त्याचे प्रतिबिंब बँका / स्मॉल बँका / एनबीएफसी / मायक्रो फायनान्स / क्रेडिट कार्ड कंपन्या यांच्या एक्सपोनान्शियल वाढीत पडत आहे.

भारताची जीडीपी ५ ट्रिलियन्स / सात ट्रिलियन्स करण्याच्या घोषणा छान आहेत; पण त्यासाठी किती भांडवल लागणार, ते कोठून येणार?

भांडवलनिर्मिती आणि देशातील वित्तीय मत्तांमध्ये कुटुंबांनी केलेल्या बचती याचे जैविक संबंध असतात असे थियरी सांगते

जाताजाता :

चीनच्या गेल्या ४ दशकातील दहापटीने वाढलेल्या जीडीपी वाढीत चीनमधील कुटुंबांनी केलेल्या बचतींचे खूप मोठे योगदान आहे. चींन या बाबतीत आत्मनिर्भर होता आणि आहे.

कोणताही देश कुटुंबांच्या बचती हवेतून उदी कढल्यासारखा वाढवू शकत नाही.

कारण सगळ्याचा मदर सोर्स कुटुंबांची मासिक , वार्षिक उत्पन्न असतो. आणि त्यासाठी अर्थव्यवस्था कॉर्पोरेट केंद्री असून चालत नाही.

लोकसंसद

भारतीय व्यक्तीचे आयुर्मान वाढले

लॅन्सेट या संशोधन पत्रिकेत जागतिक आयुर्मानाबाबत मोठी माहिती प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार १९९० ते २०२१ या कालावधीत जागतिक पातळीवर माणसाचे आयुर्मान सुमारे ६.२ इतक्या वर्षांनी वाढले आहे .याच कालावधीत भारतीय व्यक्तीचे आयुर्मान ८ वर्षांनी वाढले आहे. ही बातमी नुकतीच वाचली. इतर देशांचा विचार करता भूतान मध्ये सर्वाधिक म्हणजे १३. ६ वर्षे, बांगलादेश १३.३ वर्षे, नेपाळ १०. ४ वर्षे तर पाकिस्तान २.५ वर्षे एवढे आयुर्मान वाढले आहे. मध्यंतरी साऱ्या जगावर कोरोनाचे संकट उभे राहिले होते. त्यावेळी या संकटामुळे जागतिक पातळीवर सुमारे १.६ एवढे आयुष्य कमी झाले होते. जागतिक पातळीवर अनेक रोगांचे मृत्यू कमी झाले आहेत. त्यामध्ये अतिसार, श्वसन मार्ग संसर्ग, हृदय विकार तसेच कर्करोगामुळे होणारे मृत्यू कमी झाले आहेत. अनेक देशांनी अतिसार व हृदय विकार यामुळे होणारे मृत्यू कमी करण्यात यश मिळविले आहे. या बरोबरच वैद्यकीय सुविधा मध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. वैद्यकीय सुविधा, योग्य आहार, झोप, आर्थिक व मानसिक स्वास्थ्य व नैसर्गिक हवामान व पर्यावरण या गोष्टीवर सुद्धा दीर्घायुष्य अवलंबून आहे. विविध देशातील सरकारे माणसाचे आयुर्मान वाढण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. जर कोरोनाची लाट आली नसती तर कदाचित जागतिक या आयुर्मान १.६ वर्षांनी वाढले असते. - **शांताराम वाघ** पुणे

मराठी साहित्यिक दिनविशेष

सहा एप्रिल

१८८७:- गांधीवादी विचारवंत, लेखक, स्वातंत्र्यसेनानी पांडुरंग श्रीधर आपटे तथा आपटे गुरुजी यांचा जन्म. नवराष्ट्रनिर्मितीच्या क्षेत्रात प्रेरित झालेल्या आपटे गुरुजींनी युवा पिढीवर चांगले संस्कार व्हावेत यासाठी चरित्रात्मक आणि अनुवादीत स्वरुपाचे बरेच लेखन केले. त्यांच्या चरित्र लेखनात 'स्वराज्य मार्गदर्शक लोकमान्य टिळक', 'महात्मा गांधीदर्शन', 'सेनापती बापट दर्शन', 'श्रीकृष्णाची जन्मकथा', 'सानेगुरुजींचे ओझरते दर्शन', 'भारताचा लाडका मुलगा' तसेच 'भाग १ व २, शिष्टाचार याशिवाय डार्विनच्या उत्क्रांतीवादाच्या सिध्दांतापासून 'पूर्वजांचा शोध' आणि 'अलौकिक अभियोग' ही पुस्तक लिहिली. **१९०६:-** लेखिका, हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेच्या आजन्म सेविका, बालसाहित्यिक कावेरी भास्कर कर्वे यांचा जन्म. 'भाषा व्यवसाय भाग १ ते ४', 'माझे पुराण' हे आनंदीबाई कर्वे यांच्या आत्मचरित्राचे संपादन. 'हिंगण्याच्या माळावर' हा आठवणींचा संग्रह आणि 'कोंडाण्याचा सिंहगड', 'गाय आणि कावळा' व 'ससा व वानर', 'जाईचा वेल', 'चीनची माहिती', 'जावई बापू', 'निसर्ग कथा', 'बाळ आणि वादळे' अशी लहानांसाठी पुस्तके त्यांनी लिहिली. **१९०६:-** 'वन व वन्य जीव' यावर लेखन करणारे जोशी (कै) वि.वा.उपाख्य विनायक वासुदेव यांचा जन्म. वनविभागात अधिकारी असणाऱ्या वि. वा. जोशी यांची ३० हून अधिक पुस्तके त्यांची प्रकाशित. त्यामध्ये 'भक्तिगीत' हा गीतसंग्रह, 'वनातली मने', 'शिकारकथा', पाच कथासंग्रह, आदिवासी लोककथा, लोककथा व लोकगीतेफ हे लोकसाहित्य. 'ताडोबा राष्ट्रीय उद्यान' हा माहितीपर आणि बालकथा, लघुकथा आणि 'कशासाठी पोटासाठी' पुस्तके प्रकाशित. **१९१७:-** कवी हणमंत नरहर जोशी तथा कवी औदूबंर यांचा जन्म. 'कौमुदी विजायिनी', 'जलवंती', 'स्वर' 'झोळी', 'यात्री', 'अनाहत' आदी काव्यसंग्रह प्रसिध्द. तसेच अनेक गीते व भक्तिगीतांचे संग्रह प्रसिध्द. **१९१९:-** 'वा.ल'या नावाने परिचित असलेले समीक्षक आणि अनेक साहित्यिक, समीक्षकांच्या दोन पिढ्या घडवणारे गुरु प्रा.वामन लक्ष्मण कुलकर्णी यांचा जन्म. समीक्षेविषयीची त्यांची भूमिका त्यांनी 'साहित्य: शोध आणि बोध' या ग्रंथातून मांडली आहे. समकालीनतेचे भान ठेवून अभिजाताचा शोध समीक्षकांनी घेतला पाहिजे, त्यासाठी समीक्षेने प्रश्न उपस्थित केले पाहिजेत, अशी वालंची शिकवण होती. 'वाङ्‌मयीन टीका आणि टिप्पणी', 'वाङ्‌मयातील वाडस्थळे' हे ग्रंथही त्यांनी लिहिले. तसेच नाटककार खाडिलकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि वामन मल्हार जोशी यांच्या वाङ्‌मयीन कर्तृत्वाचे यथायोग्य मूल्यमापन पुढील पिढयांसाठी उपलब्ध करुन देणारे समीक्षाग्रंथ लिहिले. **१९३१:-** समीक्षक संपादक गंगाधर गणेश पाटील यांचा जन्म. रेखेची वाहाणी साहित्यशास्त्र समीक्षाविषयक सदराला मराठी रसिकांनी दाद दिली. तत्पूर्वी त्यांनी पु. शि. रेगे यांच्या काव्यविश्वाचा शोध घेणारा जो प्रदीर्घ निबंध दिला होता तो अतिशय गाजला. त्यांनी लिहिलेल्या वैशिष्ट्यपूर्ण निवडक समीक्षालेखांचा संग्रह समीक्षेची नवी रुपे या नावाने प्रकाशित. तसेच त्यांचे कथनमीमांसा, वाचक प्रतिसादमुखी समीक्षा सिध्दांत, रशियन रुपवाद, चिन्हमीमांसा हे साहित्य समीक्षेच्या नवनवीन सिध्दांताचा परिचय करुन देणारे लेख लिहिले. **१९३२:-** लेखक भास्कर नसरोपंत गोळे यांचा जन्म. ह्यांनी 'वहिनी', 'धूम धमाल' या मासिकांचे संपादन केले असून 'प्रवास आणि विश्वास' हे नेपाळवर प्रवासवर्णनात्मक पुस्तकासह 'फिल्मी दिनांक व रिकामी घागर' अशा कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. **१९३४:-** 'दै.नवाकाळ' या वृत्तपत्राचे संपादक अग्रलेखांचा बादशहा निलकंठ यशवंत खाडिलकर यांचा जन्म. त्यांच्या साहित्यसंपदेत 'नाट्याचार्य खाडिलकरांची नाट्यकला', 'रशियन विचारसरणीवर 'प्रॅक्टिकल सोशॅलिझम' ग्रंथ तसेच आपल्या वडिलांच्या नाट्यसाहित्याचे रसग्रहण आणि 'स्वातंत्र्यवीर सावरकर आणि प्रॅक्टिकल सोशॅलिझम', 'एक टक्का विरुध्द ९९ टक्के', 'महात्मांचा महात्मा ज्योतिराव फुल', 'टॉवर्स' ही पुस्तके अशी साहित्यसंपदा. **१९३६:-** मराठीसह हिंदी, इंग्रजी व संस्कृतमधून काव्यलेखन करणारे रामकृष्ण आनंदराव कदम यांचा जन्म. 'पहाटल्या गंधलता' आणि 'स्वरगंधा' ही त्यांची काव्ये प्रकाशित झाली आहेत. **१९४०:-** कवी भालचंद्र उर्फ गुलाबराव सीताराम सुकथनकर यांचे निधन. 'इंदूविलास' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिध्द. **१९४२:-** कवी गुरुनाथ नारायण सामंत यांचा जन्म. 'गुरुचरित्र' हा काव्यसंग्रह प्रसिध्द. **१९४८:-** कवी कादंबरीकार गोपाळ गोविंद मुजुमदार यांचे निधन. ह्यांच्या साहित्य संपदेत रामवनवासावर 'वनविहार' तसेच 'रणविहार' व 'गृहविहार' ही तीन संपूर्ण महाकाव्ये, त्यांची स्फूटकाव्येसंग्रह निर्माल्यसंग्रहाच्या दोन भागात प्रकाशित. याशिवाय चार ऐतिहासिक कादंबऱ्यांसह, 'संस्थानी राजकारणावर 'राजसेवा' हे नाटक, 'कोटणीस महाराजांचे चरित्र', 'बुध्दीबळाचा मार्गदर्शक' हा बुध्दीबळविषयक ग्रंथ, 'हे शालेय विद्यार्थ्यांकरिता' अशी साहित्यसंपदा. **१९५१:-** लेखक अण्णासाहेब जायाचा लंगोटे-पाटील यांचा जन्म. 'कशी ओवाळू रे भाऊराया', 'तहान लागली पान्याला' ही त्यांची नाटके प्रकाशित. **१९५५:-** हिंदूधर्मप्रचारक 'श्रीरामबोध' हे नियतकालिक आणि 'विश्वबोध' या साप्ताहिकाचे संपादक विनायक महाराज मसुरकर यांचे निधन. **१९५५:-** लेखक मो. ज. मुठाळ यांचा जन्म. 'हिरोशिमा', 'आंदोली' ह्या कथासंग्रहासह 'तुझे काही-माझे काही' हा काव्यसंग्रह आणि 'योगी आणि मांत्रिक' ही बालकथा, अशी साहित्यसंपदा.

संजय वझरेकर
९९७५५७६६७५

राणा-वानखेडेंत चुरशीची लढत

अमरावती : अमरावती लोकसभा मतदारसंघात अनेक वर्षांनंतर भाजपचे कमळ व काँग्रेसचा पंजा दिसणार आहे. काँग्रेसचे बळवंत वानखडेंविरुद्ध भाजपच्या उमेदवार व विद्यमान खासदार नवनीत राणा यांच्यात थेट लढत होईल. मात्र दिवसागणिक घडणाऱ्या विविध घडामोडींनी अतिशय वेग घेतल्याने यंदा चुरशीची टक्कर राहील, हे स्पष्ट आहे. विशेष म्हणजे, महाविकास आघाडी व महायुतीत एकाच वेळी बंड पुकारण्यात आल्याची घटना अमरावतीत घडली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत हे बंड टिकेल काय, याकडेच आता मतदारांचे लक्ष आहे.

चिखलीकर यांनी भरला अर्ज

मुंबई : लोकसभेच्या नांदेड मतदारसंघातील महायुतीतील भाजपचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांनी गुरुवारी शक्तिप्रदर्शन करून उमेद्वारी अर्ज भरला. त्यानंतर हिंगोली गेट भागातील मैदानावर सभा झाली, त्यावेळी फडणवीस बोलत होते. गत निवडणुकीत चिखलीकरांच्या विरोधात अशोक चव्हाण हे बलाढ्य उमेदवार होते. परंतु, जनतेने चिखलीकरांना निवडून दिले. आता अशोकराव भाजपमध्ये आहेत. त्यांना भाजपमध्ये आणण्यासाठी अनेक दिवसांपासून आमचे प्रयत्न सुरू होते. केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, मंत्री अतुल सावे, खासदार डॉ. अजित गोपछडे, भास्करराव पाटील खतगावकर, लातूरचे उमेदवार सुधाकर शृंगारे, आमदार राम पाटील रातोळीकर, डॉ. तुषार राठोड, राजेश पवार, बालाजी कल्याणकर, अमर राजूरकर, संजय कौडगे, सूर्यकांता पाटील, डॉ. माधव किन्हाळकर, ओमप्रकाश पोकर्णा, आनंद बोंढारकर व उमेश मुंडे आदी उपस्थित होते.

शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख पवारांच्या भेटीला

माढ्याच्या उमेद्वारीबाबत उत्सुकता

। मुंबई । प्रतिनिधी ।

भाजपने उमेद्वारी नाकाराल्याने नाराज धैर्यशील मोहिते-पाटील यांनी बुधवारी (दि. ३) मुंबईत ज्येष्ठ नेते शरद पवारांची भेट घेतली, त्यानंतर गुरुवारी (दि. ४ एप्रिल) दुसऱ्या दिवशी सांगोल्याचे शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख हेही पवारांना भेटले. त्यांनी डॉ. अनिकेत देशमुख यांना माढ्यातून उमेद्वारी देण्याची मागणी केली आहे, त्यामुळे माढ्याबाबत पवार काय निर्णय घेणार? याची उत्सुकता लागली आहे. महाविकास आघाडीकडून माढ्याच्या उमेद्वारीबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

धैर्यशील मोहिते-पाटील यांचा तुतारी हाती घेण्याचा कोणताच ठोस निर्णय झाला नाही. यातच डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी शरद पवार यांची भेट घेतली. माढा लोकसभेची जागा शेतकरी कामगार पक्षाला सोडावी, अशी मागणी डॉ. देशमुख यांनी पवार यांच्याकडे केली आहे.

महाविकास आघाडीकडून उमेदवारीचा निर्णय होत नसल्याने अनेक उमेद्वार गुडघ्याला बाशिंग बांधून बसल्याचे दिसून येत आहेत. या मतदारसंघातून राष्ट्रवादीचे अभयसिंह जगताप, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी माढा लढविण्याचे संकेत दिले आहेत. परंतु, या मतदारसंघात मोहिते-पाटील कोणता निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. माढ्याबाबत पवार कोणता निर्णय घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यातच गुरुवारी (दि. ४) रोजी शेतकरी कामगार पक्षाचे डॉ. देशमुख यांनी मुंबई येथील शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी जाऊन माढ्याची जागा शेतकरी कामगार पक्षासाठी सोडावी, अशी मागणी केली आहे.

या मतदारसंघातून डॉ. देशमुख यांना उमेद्वारी द्यावी, अशी मागणी पवार यांच्याकडे केली असल्याची माहिती डॉ. देशमुख यांनी केली आहे.

यावेळी त्यांनी मतदारसंघातील असलेली परिस्थितीचा आढावाही घेतला. माढा लोकसभा मतदार संघ हा परंपरागत पुरोगामी विचारसरणीचा मतदारसंघ असून या मतदारसंघातील जनता ही पुरोगामी विचारधारा जोपासणारी असून जर शेतकरी कामगार पक्षाला माढा लोकसभा मतदारसंघातून उमेद्वारी आघाडीच्या माध्यमातून दिली तर विजय निश्चित होईल, असा विश्वासही डॉ. देशमुख यांनी पवारांना दिला.

शेकापची दीड लाख मते

यापूर्वी रायगड, धाराशिव या ठिकाणी शेतकरी कामगार पक्षाचे खासदार होते. त्यांचे कार्य सुद्धा लोकाभिमुख होते. माढा लोकसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाची दीड लाख मते आहेत. डॉ. अनिकेत देशमुख यांना महाविकास आघाडीच्या माध्यमातून उमेदवारी दिली तर या मतदानाचा फायदा होईल. या भेटीवेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड उपस्थित होते.

सत्यजित पाटलांची 'मशाल' जयंत पाटलांच्या हाती!

। इस्लामपूर । वृत्तसंस्था ।

हातकणंगले लोकसभा मतदारसंघात सत्यजित पाटील-सरुडकर यांची महाविकास आघाडीतून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून उमेद्वारी घोषित झाल्याने जयंत पाटील यांची जबाबदारी वाढली आहे.

राजू शेट्टी महाविकास आघाडीत न आल्यास आम्हाला दुसरा उमेद्वार देण्याशिवाय पर्याय नाही, अशी प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी या पूर्वी माध्यमांना दिली होती. त्यामुळे इस्लामपूर विधानसभा मतदारसंघाशी अत्यंत अल्पपरिचय असलेले सत्यजित पाटील यांची पर्यायाने शिवसेना ठाकरे गटाची मदारही जयंत पाटलांच्या खांद्यावर असणार आहे.

सत्यजित पाटील-सरुडकर हे या लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार गट, काँग्रेस व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या राजकीय पक्षांच्या महायुतीकडून उमेदवारी करीत आहेत. महायुतीने ही जागा घेताना हातकणंगले, शिरोळ, शाहूवाडी व इस्लामपूर या मतदारसंघात चाचपणी करून विजयाची गणिते मांडत उमेदवार दिला आहे. हातकणंगलेतील इस्लामपूर व शिराळा हे दोन्ही मतदारसंघ राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रभावाखाली येतात. या ठिकाणी काँग्रेसचीही बऱ्यापैकी ताकद आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटाची ताकद अत्यल्प आहे. त्यामुळे सत्यजित पाटील यांचे शिवधनुष्य या मतदारसंघात जयंत पाटील यांना उचलावे लागणार आहे.

कऱ्हाड-पाटण नेते मुंबईत तळ ठोकून

। सातारा । वृत्तसंस्था ।

सातारा लोकसभा मतदारसंघासाठी महायुती आणि महाविकास आघाडीची उमेद्वारी जाहीर झालेली नाही. त्यावरून मोठा ट्विस्ट निर्माण झाला आहे. उमेद्वार कोण असणार? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. येत्या दोन दिवसांत उमेदवार जाहीर होतील, अशी चिन्हे आहेत. त्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील कऱ्हाड-पाटण तालुक्यातील नेते कालपासूनच मुंबईत तळ ठोकून आहेत.

सातारा लोकसभा मतदारसंघात पहिल्यांदाच उमेद्वारी कोणाला द्यायची, यावरून संभ्रम निर्माण झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडे जिल्ह्यातील दिग्गजांची फळी असूनही पक्षात फूट पडल्यामुळे उमेद्वारीचा पेच निर्माण झाला आहे. खा. श्रीनिवास पाटील यांनी प्रकृतीच्या कारणास्तव निवडणुकीला उभे राहण्यास नकार दिला. त्यामुळे पहिल्यांदाच सातारा लोकसभेचा राष्ट्रवादीचा उमेद्वार ठरविण्यासाठी पवार यांना साताऱ्यात यावे लागले.

त्यांनी पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेतल्यानंतर आमदार बाळासाहेब पाटील, शशिकांत शिंदे, सत्यजितसिंह पाटणकर यांची नावे पुढे आली. मात्र, राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्याची उमेद्वारी कोणाला द्यायची? हे अद्याप जाहीर केलेले नाही. दरम्यान, मागील काही दिवसांपासून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे नाव चर्चेत आले. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खा. पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी चव्हाण यांच्याबरोबर बंद दाराआड चर्चा झाली होती. यामध्ये पाटील यांनी पृथ्वीराज चव्हाणांना सातारा लोकसभा तुतारीच्या चिन्हावर लढण्याचा प्रस्ताव दिला होता.त्यामुळेआघाडीच्या या सर्व घडामोडींसाठी कऱ्हाड-पाटण तालुक्यातील नेते कालपासून मुंबईत तळ ठोकून आहेत.

'वंचित'कडून मतविभाजनाचे डावपेच सुरू

। मुंबई । वृत्तसंस्था ।

लोकसभेच्या धुळे मतदारसंघात यंदा होणारी निवडणूक वैशिष्ट्यपूर्ण आणि चुरशीची होणार आहे. प्रस्थापित भाजप विरूध्द काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी, एमआयएम रिंगणात असणार आहे. यात वंचितने मुस्लीम समाजास उमेद्वारीची संधी देत मत विभाजनाच्या डावपेचांना सुरूवात केल्याचे मानले जात आहे. या रणनितीचा भाजप, काँग्रेसच्या उमेद्वाराला काहीअंशी फटका बसणार असल्याची चर्चा रंगू लागली आहे. लोकसभेच्या धुळे मतदारसंघात सर्वाधिक मराठा-पाटील समाजानंतर मुस्लीम समाजाचे प्राबल्य आहे. आदिवासी, दलित व इतर समाज निर्णायक ठरत असतात. यातील जातीय समीकरणे आणि मतांच्या विभाजनातून प्रस्थापितांना शह देण्याचा प्रयत्न प्रतिस्पर्ध्यांकडून होत असतो. हाच धागा पकडून वंचित बहुजन आघाडीने मुस्लीम समाजाला उमेद्वारीची संधी दिल्याचे मानले जाते. यात माजी सनदी पोलीस अधिकारी अब्दुल रहेमान हे वंचित बहुजन आघाडीचे उमेद्वार जाहीर झाले आहेत.

वंचित बहुजन आघाडीतर्फे उमेद्वार रहेमान यांच्या माध्यमातून मुस्लीम, दलित, आदिवासी समाज आकृष्ट करण्याचा प्रयत्न आहे. मणिपूर येथील घटनेप्रकरणी नाराज आदिवासी समाजाने वंचित बहुजन आघाडीच्या पाठीशी राहावे, असे नेत्यांना वाटते. शिवाय एमआयएम उमेद्वार देण्याच्या प्रयत्नात आहे. अशी जातीय समीकरणे मतदारसंघात विणली गेली तर ती प्रस्थापित भाजप आणि काँग्रेसला काहीअंशी फटका देणारी ठरणार आहेत.

प्रचाराच्या रणधुमाळीत सेलिब्रिटींची मांदियाळी

। मुंबई । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीचे मतदान जसे जवळ येत आहे, तसे प्रचारालादेखील जोर येत आहे. प्रचाराच्या माध्यमातून आपण लोकांसाठी कसे काम करणार आहोत, हे पक्षांकडून आणि उमेद्वारांकडून सांगण्यात येत आहे. प्रचारात नेते, आमदार, खासदार यांच्यासह स्टार प्रचारकही लोकांचं लक्ष वेधून घेतात. त्याचबरोबर लोकसभा मतदारसंघातील मतदारांना आणि लोकांना आकर्षित करण्यासाठी प्रचारात आता सेलिब्रेटिंनासुद्धा उतरवलं जाणार आहे. कारण कलावंत मंडळींची चांगलीच लोकप्रियता असते. त्यांच्या कार्यक्रमांना लोकांचा चांगला प्रतिसाद मिळतो. राजकीय पक्षांकडून प्रचारात सेलिब्रेटींना उतरुन प्रचाराला मोठी गर्दी खेचण्याची खेळी खेळली जाणार आहे. कारण प्रचारात सेलिब्रिटी आले तर त्यांना पाहण्यासाठी, बघण्यासाठी, त्यांच्याबरोबर सेल्फी काढण्यासाठी, फोटो काढण्यासाठी स्वाभाविकच लोकांची मोठी गर्दी होते. सेलिब्रिटींची एक झलक पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होते.

मात्र, कलाकार विविध चित्रपट आणि नाटक संघटना, संस्थाच्या माध्यमांतून राजकीय पक्षांसाठी काम करत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिव चित्रपट सेनेत सुशांत शेलार, माधव देवचके, राजेश भोसले, योगेश शिरसाट, शर्मिष्ठा राऊत, हार्दिक जोशी आणि आदिती सारंगधर आदींचा समावेश आहे. तर मराठीतील सुपरस्टार भरत जाधव, अंकुश चौधरी, स्वप्निल जोशी, सिद्धार्थ जाधव, केदार शिंदे, सुबोध भावे, आदेश बांदेकर, मकरंद अनासपुरे, प्रसाद ओक आदी अभिनेते प्रचारात उतरताना दिसतील. तसंच प्राजक्ता माळी, सई ताम्हणकर, अमृता खानविलकर, सोनाली कुलकर्णी, नेहा पेंडसे, प्रिया बापट, स्पृहा जोशी यांच्यासह आदी अभिनेत्रीदेखील प्रचारात पाहायला मिळणार आहेत.

सामंतांसाठी रत्नागिरीत शिवसैनिक आक्रमक

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदार संघात महायुतीच्या उमेदवाराचा तिढा अद्याप कायम आहे. शिवसेना-भाजपा दोन्हीकडून दावा केला जात आहे. अशातच बैठकांचे सत्र देखील दोन्ही पक्षांकडून सुरू आहे. रत्नागिरी येथे शिवसेनेची महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली. रत्नागिरीतील पदाधिकारी, कार्यकर्त्यांची ही बैठक होती. या बैठकीला मंत्री उदय सामंत उपस्थित होते. मतदार संघाबाबत यावेळी भूमिका बैठकीत मंडण्यात आली.

किरण सामंत यांचें बैठकीच्या ठिकाणी आगमन होताच कार्यकर्त्यांनी त्यांना उचलून घेत व्यासपीठावर नेले. तसेच कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी शिंदे शिवसेनेकडून जोरदार शक्तिप्रदर्शन करत किरण सामंत यांच्या उमेद्वारीची मागणी कार्यकर्त्यांनी लावून धरली. यावेळी उदय सामंत म्हणाले की, हे शक्ती प्रदर्शन नाही. या पदाधिकाऱ्यांच्या भावना आहेत. कार्यकर्त्यांच्या भावना नेत्यांपर्यंत पोहोचवणे हे शक्तिप्रदर्शन नाही. राणे यांची काल भेट घेतली तेव्हा महायुतीचा उमेद्वार निवडून आला पाहिजे असे राणे यांनी सांगितले. तिकीट वाटपामध्ये कार्यकर्त्यांना भरडले जात आहे.

भिवंडीत म्हात्रे पाटील यांची काटे की टक्कर

। ठाणे । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीसाठी भिवंडी मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने भिवंडी लोकसभा प्रभारी सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांना गुरुवारी (दि.४) उमेदवारी जाहीर केली आहे.

सुरेश म्हात्रे यांना उमेद्वारी जाहीर होताच भिवंडीत राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केल्याचे पाहायला मिळाला.

भिवंडीत भाजपाचे खा. कपील पाटील यांना याआधीच महायुतीकडून उमेद्वारी जाहीर झाली आहे. मात्र, आघाडीकडून भिवंडीसाठी सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्यामामा यांना उमेद्वारी जाहीर करण्यात आली आहे.

२०१४ मध्ये त्यांनी मनसेतर्फे निवडणूक लढली होती, ते ठाणे जिल्हा परिषदेच्या राजकारणात सक्रिय झाले. २०२१ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. विकासाच्या मुद्द्यावरून हे दोघे नेहमी आमने-सामने आल्याचे पाहायला मिळत आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यामान मालक **१) श्री. महेंद्र मधुकर निमकर २) सौ. मंगला मधुकर निमकर** यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे आशिल यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे

-: मिळकतीचे वर्णन :-

मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग
१५८५ बागायत क्षेत्र ०-२९-६० हे.आर., पो. ख. ०-०१-०० हे. आर.
एकुण क्षेत्र ०-३०-६० हे. आर., आकार १२.८७ रु. पैसे.
या मिळकतीबाबतचे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज् अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवासांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण: अलिबाग
दिनांक: ०५/०१/२०२४

ॲड. तनुष्का पेडणेकर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ७०५७८८१६६६

EXTENSION OF NOTICE FOR INVITING TENDER

The tender for the work of "Appointment of project management consultant for plotting layout project of Pragati Nirman Chs Ltd., at kalamb, Taluka-Karjat, Raigad" was invited from 22 Jan 2024 to 30 Jan 2024 for filing. Now the said date of 30 Jan, 2024 has been extended up to 15 April 2024.

Secretary
Pragati Nirman Co-Op. Housing Society

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender Specification.

Tender No. : E-Tender - 05/ 2024-25 **Name of Tender :** E-Tender for the work of unloading of EHV materials/equipments by crane & labours at Major Stores, Panvel for FY 2024-25. **Tender Fee :- Rs. 500/- + applicable GST** **RFx No.- 7000031090**	**Online Downloading the RFx :** Dt.06.04.2024, 00:00 Hrs. to 12.04.2024, 23:59 Hrs. **Online Submission of the RFx :** On or Before Dt. 12.04.2024, 23:59 Hrs. **Online Opening of the Techno Commercial RFx :** Dt. 13.04.2024, at 10:00 Hrs. (If possible). **Online Opening of the Price bid:** Dt. 13.04.2024 at 12:00 Hrs. (If possible)

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: -The Executive Engineer, Mobile No. 9930057633
Note : All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

Sd/-
Executive Engineer (I/C) Major Stores, Panvel

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, **श्री. ज्ञानेश्वर अर्जुनराव साबणे,** यांनी जमीन मालक **श्री. संतोष शिवाजीराव देशमुख** यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे - दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत

सर्व्हे नंबर	क्षेत्र हे. आर. पॉ.	आकार रु. पै.
५७/४	०.३८.०० पो.ख. ०.०२.०० **एकूण : ०.४०.००**	०.४०

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. ०६/०४/२०२४ कळावे

ॲड. संदिप मारूती घरत
ऑफिस:- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.
कर्जत, जि. रायगड, पिन ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक राजेश उमेदमल ओसवाल वैगेरे ९ व रिता अशोक ओसवाल यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.पॉ	आकार रु. पै.
८	१	१-७९-२० पैकी विकत देणार यांच्या मालकीचे विकत दिलेले क्षेत्र ०-६७-१०	१३-८९

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०६/०४/२०२४

ॲड. समीर आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
मो.नं.९१५८३१३७३३
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विदयमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे पराडे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.

स. नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)	भोगवटाधारकाचे नाव
९/४	०.२७.००	०.२८	श्री. हरिभाऊ वाळकु लाड

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणा-या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत सही/-
दिनांक :- ०६/०४/२०२४. **ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास, नानामास्तरनगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक **लिलावती पुरुषोत्तम वर्मा**, यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :-

-: मिळकतीचे वर्णन :-

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग क्र.	क्षेत्रफळ (हे. आर.)	आकार (रू. पैसे)
कावाडे ता. अलिबाग, जि. रायगड	१०	क्षेत्र ०-१३-४० पो.ख. ०-०१-६० एकुण ०-१५-००	३.१३

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षिस, दान, जप्ती, लिजु अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हिसंबंध नाहीत असे गृहीत धरून त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण:- अलिबाग
दिनांक : ०५/०४/२०२४

सही/-
ॲड. विनित जितेंद्र वर्तक
रा. बुरुमखाण, वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ७३५००७१६९३/९२८४४२२४११

निवडक

नागादेवीची पालखी

रत्नागिरी : लांजा तालुक्यातील गोळवशी गावची ग्रामदेवता नागादेवीची पालखी शुक्रवारी (दि.५) सकाळी राजापूर तालुक्यातील गंगामाईच्या भेटीला आली. यावेळी गंगामाई विश्वस्त मंडळाच्या पुजाऱ्यांनी पालखीला अभिषेक करून पूजा केली. गंगामाईच्या कुंडांभोवती ढोल तासाच्या गजरात आणि सनई सूराच्या मधुर तालावर पालखी नाचविण्यात आली. पालखी भेटीच्या सोहळ्यात गावातील पाच मानकरी, सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष तसेच मान्यवरांसह सुमारे दोनशे ग्रामस्थ सहभागी झाले होते.

आर्मी स्कूलमध्ये प्रवेश

पनवेल : विजय आर्मी स्कुल अ‍ॅन्ड जुनिअर कॉलेज चिखले येथे प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इयत्ता सातवी ते बारावीसाठी ओबीसी आणि खुल्या संवर्गातील काही रिक्त जागांसाठी प्रवेश सुरू आहे. सहावी व सातवीसाठी प्रवेश पूर्व परीक्षा रविवारी (दि.७) सकाळी ९.३० वाजता होणार आहे. तसेच, अनिवासी विद्यार्थ्यांनाही प्रवेश घेता येणार आहे. अकरावी विज्ञानसाठी ऑफलाईन प्रवेश नोंदणी सुरू आहे. अधिक माहितीसाठी एम.के. मराठे ९८६७३०१७२५, डी.एन. गावंड ९८६७१२१९६२ यांच्याशी संपर्क साधायचा आहे.

मद्यविक्रेत्यांवर करडी नजर

पनवेल : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व हॉटेल व्यावसायिक व मद्यविक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर अता निवडणूक आयोगाद्वारे पुरवठा साखळी व्यवस्थापन ॲप सुरु करण्यात आले आहे. या ॲपमध्ये दररोजची मद्य खरेदी व विक्रीची माहिती संबंधित व्यावसायिकांना द्यावी लागणार आहे. यापुढे मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी मद्याचा महापूर व वाटप कुठल्याच पक्षाला करता येणार नाही आहे. या ॲपमुळे चोरून दारू खरेदी विक्री, बनावट भेसळयुक्त दारू विकता येणार नाही.

दिगवंत मुलीचा वाढदिवस साजरा

रसायनी : ग्रामविकास अधिकारी प्रशांत कदम यांची अकरा वर्षीय मुलगी स्मरणिका प्रशांत कदम हिचे नुकतेच निधन झाले. स्मरणिकाला दिव्यांगांबद्दल खूप सहनभुती होती. तिच्या वाढदिवसानिमित्त तिच्या कुटुंबीयांनी सोफिया या दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांना तसेच शिक्षक आणि कर्मचारी यांना भेट वस्तू देऊन तिच्या आठवणींना उजाळा दिला. या भावपूर्ण कार्यक्रमात उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू अनावर झाले.

प्रबोधिनीचे पुरस्कार जाहीर

पनवेल : ओम कबड्डी प्रबोधिनी प्रतिवर्षी आपल्या वर्धापन दिनानिमित्त ज्यांनी आपल्या दैदिप्यमान खेळाने जिल्ह्याचे, संघाचे नाव उज्वल केले अशा महान खेळाडूचा सन्मान पुरस्कार देऊन करत असते. यंदा हा पुरस्कार महिलांमध्ये नवयुग क्रीडा मंडळ व बँक ऑफ महाराष्ट्र मुंबईची डावी मध्य रक्षिका स्मृती देव यांना, तर पुरुषांत वडेश्वर क्रीडा मंडळ व सेंट्रल बँक मुंबईचा अष्टपैलू खेळाडू चंद्रकांत पिरवरे यांना जाहीर करण्यात आला आहे.

काजुगरामुळे आदिवासी महिलांना रोजगार

। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।

मुरूड शहराच्या बाजारात टपोऱ्या ओल्या काजुगराची आवक मुबलक प्रमाणावर वाढली असून शेकडा १०० ते १२० रुपये दराने ओले काजुगर विक्री होत आहे. रोहा तालुक्यातील आदिवासी महिला ओले काजुगर विकायला घेऊन येत असून त्यांना मोठा रोजगार मिळत आहे.

फेब्रुवारी महिन्यापासून ओल्या काजुगराचा हंगाम सुरू होतो. हा हंगाम मे महिन्यापर्यंत असतो. सुरुवातीला १६० ते १८० शेकडा दर असणारे काजुगराचे दर हळूहळू खाली येतात. मुरूड बाजारात रोहा तालुक्यातील मुचणे, विरझोली, गोपळवट, म्हसाडी, ऊचेल आदि आदिवासी वाड्यांवरील महिला ओले काजूगर विकण्यासाठी येत असतात. एकेकाळी दुर्लक्षित असणारी काजूची झाडे रस्त्यावरून प्रवास करताना जागोजागी दिसायची; परंतु, आता हमखास उत्पन्न आणि मागणी असल्याने रायगड, रत्नागिरी, ठाणे, सिंधुदुर्ग, पालघर आदी कोकण प्रदेशात ओसाड, मोकळ्या जमिनीत काजूची लागवड मोठ्या प्रमाणात केली जात आहे. गेल्या १० वर्षांत काजूच्या बागा बहरल्या असून बागायतदार ओले काजुगर सुकवून विक्रीला पाठवू लागले आहेत. काही ठिकाणी आदिवासी बांधव देखील काजूच्या बागा हंगामामध्ये भाडे तत्वावर घेऊन ओले काजुगर ८०० रु. किलोने विकतात. कोकणातील काजूगराची चव, महत्व आणि मागणी भारतभर आणि विदेशात असल्याने भविष्यात कोकणात रोजगारी आणि उत्पन्नाचे आधिक मोठे स्तोत्र हमखास उभे राहणार, असे दिसत आहे.

> रोहा बाजारपेठेत महिला विक्रेत्यांची संख्या आधिक आहे. मुचणे ते मुरूड अंतर ३२ किमी असूनही मुरूडमध्ये काजुगरांची अधिक मागणी असल्यामुळे विक्री जलद होत असते. शिवाय येथे सुक्या काजुगरापेक्षा ओल्या काजुगरांना भाव आधिक मिळतोय. त्यामुळे आम्हाला मुरूड बाजारपेठ योग्य वाटते.
> - सुनंदा वाघमारे, महिला विक्रेता

काजुगर काढण्याची कसब

रात्री किंवा पहाटे काजुगराच्या बिया जंगलातून आणल्या जातात. हाताला राखाडी लावून आणि अणूकुचीदार हत्याराने पारंपारिक पद्धतीने बिया फोडून काजूगर काढण्याचे कसब विलक्षण आहे. ओले काजूगर घालून मटण, चिकन मसाला, काजुगरांची सुकी-ओली भाजी, रस्सा असा स्वादिष्ट खाद्य प्रकार लोकप्रिय झालेला आहे.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

। कोलाड । वार्ताहर ।

तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट प्रसंचालित डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवे-कोलाड संस्थेचे ट्रस्टी संदीप तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि.१) तृतीय वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य वर्गाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारभ संपन्न झाला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास देशमुख, नेहल प्रधान, अमोल गोलीपकारव प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. तसेच, डॉ. विश्वास देशमुखी यांनी विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात सत्य, जिद्द, चिकाटी व प्रामाणिकता जवळ असेल तर यश संपादनासाठी वेळ लागणार नाही. त्यासाठी जिद्द महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांमध्ये यशस्वी होण्यासाठी अनेक स्पर्धात्मक परीक्षेला सामोरे जाणे गरजेचे आहे. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेत जो टिकेल तोच खरा यशस्वी होईल, तरी या पुढे खूप काही शिकण्यासारखे आहे. खूप शिका मोठे व्हा, आई-वडिलांसोबत गुरूंचेही नाव मोठे करा, असा संदेश त्यांनी यावेळी दिला.

माथेरानमध्ये खड्डे भरण्यास सुरुवात

। माथेरान । वार्ताहर ।

एमएमआरडीएच्या माध्यमातून मुख्य रस्त्यावर पर्यावरणपूरक क्ले पेव्हर ब्लॉक लावण्यात आले होते. परंतु, त्यातील काही निकृष्ट दर्जाच्या ब्लॉकमुळे रस्त्याला जागोजागी खड्डे पडले होते. त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करताना अनेक पर्यटक पडून जखमी झाले आहेत. तसेच, याच रस्त्यावरून वाहतूक करणाऱ्यांना सुध्दा त्रासदायक बनले होते. यासंदर्भात राकेश कोकळे माथेरानच्या मुख्याधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करत होते. अखेरीस त्यांच्या निवेदनाची दखल घेत मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी या रस्त्यावर नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांमार्फत माती आणि खडीने खड्डे बुजवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.

तसेच, माथेरानमध्ये विकास कामे होत असताना ती कशा पद्धतीने पूर्ण केली जात आहेत, ठेकेदार कामाला दर्जा देत आहे की नाही, याबाबत नागरिकांनीसुद्धा जागरूक असणे गरजेचे आहे. अनेकदा ठेकेदार कामांमध्ये चालढकल करत असतात कामे लवकरच आटोपून बिले काढण्याची घाई असल्यामुळे कामे तकलादू होत असतात. यासाठी नागरिकांनी होत असलेल्या कामांवर बारकाईने लक्ष ठेवणे गरजेचे असल्याचे राकेश कोकळे यांचे म्हणणे आहे.

बांधावरील वणवे वृक्षांच्या मुळावर

। खांब । वार्ताहर ।

शेतीच्या मशागतीसाठी ऊन्हाळी हंगामात शेतीच्या बांधावर लावलेले वणवे काळजी न घेतल्याने झाडांच्या मुळावरच उठत आहेत. तर, यामुळे छोटी झाडे झुडपेही आगीच्या भक्ष्यस्थळी पडत असल्याने एकूण बांधावरील वनसंपदा धोक्यात येऊ लागली आहे.

शेतीच्या मशागतीसाठी जमिन भाजलावण्याची परंपरा गेली अनेक वर्षापासून चालू आहे. त्यामुळेच पावसाळी शेतीच्या हंगामापूर्वी दरवर्षी ऊन्हाळ्यात शेतीमध्ये राब भाजले जातात. या पद्धतीमुळे जमिनीचा पोत सुधारतो व उत्पन्नाचे प्रमाणही वाढते. ऊन्हाळी हंगामात साधारणतः होळी सणाच्या काही दिवस अगोदरच राब भाजण्याच्या कामास प्रारंभ केला जातो ते थेट मे महिन्यापर्यंत राब भाजण्याचे काम चालू असते. या कामातंर्गत शेतीमध्ये पालापाचोळा, शेण, विविध जातीचे गवत, वाया गेलेली गुरांची पेंढी, काट्याकुट्या यांची भाजनावळाला वापर केला जातो.

या भाजनावळीत पावसाळ्यात शेतीच्या बांधावरील वाढलेले गवतही जाळले जाते. परंतू गवत जाळल्यानंतरही गवताच्या विस्तवाची आग न विझविल्याने याचे रूपातर वणव्यात होते. पर्यायाने शेतीच्या बांधावर असलेली झाडी झुडपे तसेच मोठी झाडे या वणव्याच्या बळी पडल्याने वृक्ष संपदेची फारच मोठी हानी होते. अशा प्रकारच्या अनपेक्षितपणे लागल्या जाणा-या वणव्यांमध्ये कोणतीही काळजी न घेतल्याने त्याचे रूपांतर वणव्यात होऊन जंगलांचे तसेच मनुष्य वस्तीलाही आग लागुन जीवीत हानीचा धोका संभवतो.

अखंड हरिनाम यज्ञ सोहळा

। कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील श्री.गणेश सत्संग मंडळ आंबेवाडी नाका येथे गेली अनेक वर्षापासुन चालत आलेल्या साती आसरा देवीच्या उत्सवाच्या निमित्ताने अखंड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या नवव्या व बाराव्या अध्ययांचे पारायण व त्या निमित्ताने हरिपाठ, प्रवचन, किर्तन, भजन इत्यादी कार्यक्रमांचे रविवारी (दि.७) व सोमवारी (दि.८) आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी मंगल विधी-कळस स्थापना, माऊली पूजन, विणा पूजन, अनुष्ठान स्थापना, गुरुपुजन, ध्वज रोहन, सकाळी ज्ञानेश्वरीच्या नवव्या व बाराव्या अध्ययाचे पारायण, दुपारी महाप्रसाद, सायंकाळी सामुदायिक हरिपाठ, रात्री भुषण तळणीकर यांचे किर्तन. सोमवारी पहाट काकड आरती, सकाळी विजयानंद तेलंगे यांचे किर्तन, सायंकाळी नगर प्रदक्षिणा होणार आहेत.

तरी सर्व भाविकांनी श्रवण सुखाचा लाभ घ्यावा, अशी विनंती आयोजकांकडून करण्यात येत आहे.

versity and
stem-based
ate change

हवामान बदलाबाबत चर्चासत्र

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग येथे जैवविविधता हानी आणि हवामान बदल या गंभीर समस्यांचे निराकरण करण्याच्या प्रयत्नात जैवविविधता आणि पर्यावरण आधारित हवामान बदल अनुकूलन यावर लक्ष केंद्रित करणारे चर्चासत्र आगा खान एजंसी फॉर हॅबिटाट इंडिया तर्फे हॉटेल मॅपलायव्ही येथे आयोजित करण्यात आले होते. यामध्ये या विषयावरील तज्ञ, भागधारक आणि समुदाय सदस्य एकत्रित आले. जैवविविधता जतन करण्याच्या धोरणांवर चर्चा करण्यासाठी आणि वातावरणातील बदलांशी जुळवून घेण्यासाठी पर्यावरणास अनुकूल दृष्टिकोन या चर्चासत्रातून सहभागींना मिळाला.

या चर्चासत्राचे उद्घाटन रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अलिबाग प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, टाटा इंस्टिट्यूट ऑफसोशल साइंसेसचे प्रा. महेश कांबळे, आगा खान एजन्सी फॉर हॅबिटाट इंडियाच्या मुख्यकार्यकारी अधिकारी प्रेरणा लांगा आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनानंतरच्या दोन सत्रांमध्ये डॉ. सतीश ठिगळे (भूगर्भशास्त्रज्ञ), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे भूगर्भशास्त्र विभागाचे माजी प्रमुख दत्ताराम गोंधळी, सोशल अँड डिजास्टर मैनेजमेंट असोसिएशनचे डॉ. निलेश चांदोरकर, डॉ. किरण माळी, जयवंत गायकवाड या मान्यवरांनी मांडणी केली.

चर्चासत्रामध्ये जैवविविधता संवर्धन आणि हवामान बदल अनुकूलन यांच्यातील परस्परसंबंध, प्रभावी धोरणे अंमलात आणण्यासाठी सरकारी, गैर-सरकारी संस्था, स्थानिक समुदाय आणि इतर भागधारक यांच्यात सहयोगी प्रयत्नांच्या गरजेवर भर, जैवविविधता संवर्धन प्रयत्नांसाठी प्राधान्य क्षेत्रांची ओळख, पर्यावरणीय बदल, शाश्वत शेती यांसारख्या पर्यावरणीय बदल अनुकूलनासाठी निसर्ग-आधारित उपायांचा शोध या ठळक बाबींवर चर्चा करण्यात आली. जैवविविधता हानी आणि हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी ठोस कृती करण्याची आपली वचनबद्धता सहभागींनी व्यक्त केली.

मतदान जागृतीसाठी प्रचार फेरी

आगरदांडा : स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने नांदगाव येथे प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या आदेशानुसार, मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील नांदगाव येथील सहजीवन विद्यामंडळ संचलित श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- मांडवा जेट्टी येथील घर व घराच्या आजूबाजूचा परिसर साफ सफाई करण्यासाठी पुरुष/मुलगा पाहिजे.मासिक पगार रुपये ८०००/- ते १००००/- वयाची अट नाही. संपर्क : ८६९८६८२१२१
- अकाऊंटंट पाहिजे- जीएसटी बील व रिर्टनस्चा कमीत कमी २ वर्षे अनुभव असावा. प्रत्यक्ष भेटा. संपर्क ९६२३११११४६०. एम.जे. एन्टरप्रायजेस, ब्राह्मण आळी, अलिबाग.
- विक्री आणि marketing व्यक्ती आवश्यक आहे । किमान पदवी पूर्ण केलेला । ०-२ वर्षे अनुभव । प्रतिस्पर्धी पगार । marketing कौशल्ये असली पाहिजेत Accountant आवश्यक आहे । टॅली अनिवार्य । ०-२ वर्षे अनुभव । सर्व दुकान खाते घेणे पाहिजे । दुकानमधून काम । प्रतिस्पर्धी पगार रसिक हार्डवेअर । फोन नंबर: +९१ ९४२२६९०८५४
- अलिबाग व जवळच्या भागातील दर महिन्यास ३०० नग सोललेले नारळ पाहिजेत. मोबाईल : ९८६७१११७०५
- फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही. असे दोन २ BHK फ्लॅटस त्वरीत विकणे आहेत. पहिल्या फ्लॅटची किंमत ७३ लाख व दुसऱ्या फ्लॅटची किंमत ८३ लाख संपर्क : ८६९८६८२१२१
- पॅकिंग, कटिंग, चेकिंग तसेच शिवणकामासाठी महिला मुली पाहिजेत. संपर्क : ९०११२९३१२१, ७२१९३०८००६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

महिला पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

। रसायनी । वार्ताहर ।

रयायनीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे रायगड जिल्हा महिला संघटक सुवर्णा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसंवाद कार्यक्रमात संगीता संजय भंडारकर यांची शिवसेना पनवेल तालुका महिला संघटक, नूतन पाटील यांची पनवेल उपतालुका महिला संघटक, रुपाली राजेश पाटील यांची गुळसुंदे विभाग महिला संघटक व रेश्मा निलेश पवार यांची उलवे शहर महीला प्रमुखपदी निवड करून त्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत निवड पत्र देण्यात आले.

दारुची बेकायदेशीर वाहतूक करणारा अटकेत

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनीत स्थानिक गुन्हे शाखेकडील सपोनी पोमण व पथकाला एक व्यक्ती मोटरसायकलवर अवैधरीत्या बेकायदेशीर गावठी दारूची खारपाडा ते रसायनी अशी वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाली होती. लगेचच रसायनी येथील कराडे गावात पोलिसांनी सापळा लावला. यावेळी आरोपी संतोष बाबुराव घरत रा.खारपाडा-पेण हा मोटारसायकलवरुन गावठी दारू घेउन येत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून ५० लिटर म्हणजेच ६ हजार रु. किंमतीची गावठी हातभट्टीची दारू व किंमत ५० हजार रु. किंमतीची बजाज डिस्कवर मोटरसायकल असा एकूण ५६ हजार रु. किमतीचा मुद्देमाल जप्त केला. हा जप्त केलेला मुद्देमाल व आरोपीला पुढील कायदेशीर कार्यवाही करण्याकरिता रसायनी पोलीस ठाणे यांच्याकडे सुपूर्द केला आहे. ही कार्यवाही सपोनी पोमन, ए.एस.आय राजेश पाटील, प्रसाद पाटील, एच.सी.संदीप पाटील, राकेश म्हात्रे, सुधीर मोरे, यशवंत जेमसे यांनी केली.

रायगडातील शासकीय कर्मचारी अडचणीत

। रायगड । प्रतिनिधी ।

- मोफत धान्य योजनेचा लाभ घेतल्याचा फटका
- कर्मचाऱ्यांच्या चौकशीसाठी समितीचे गठन

शासकीय कर्मचारी असतानाही मोफत धान्य योजनेचा लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोफत धान्य घेतल्याचा फटका बसण्याचे निश्चित झाले आहे. रायगड जिल्ह्यात शिधा वाटप केंद्रांवर, मोफत धान्याची उचल करणारे १ हजार ६५६ नोकरदार सापडले आहेत. आधार सलग्न प्रणालीमुळे सरकारी बाबूकडून मोफत धान्य उचल प्रकरणे उघडकीस आली आहेत. ही बाब उघडकीस येताच, या सर्वांचा धान्यपुरवठा आता थांबविण्यात आला आहे. तसेच, मोफत धान्य उचल करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. यामुळे मोफत धान्य योजनेचा लाभ घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पंतप्रधान गरीब कल्याण अन्य योजनेअंतर्गत अंत्योदय कुटूंबाना दरमहा ३५ किलो तर, प्राधान्य कुटूंबांना प्रति व्यक्ती पाच किलो धान्य वितरण सध्या केले जात आहे. याच योजनेअंतर्गत पुढील पाच वर्षांसाठी देशातील ८० कोटी लाभार्थ्यांना धान्य मोफत दिले जाणार आहे. यासाठी केंद्र सरकार १२ लाख कोटी रुपये खर्च करणार आहे. देशातील कोणताही भारतवासी उपाशी राहू नये, हा या योजनेचा उद्देश आहे. मात्र, या मोफत धान्य योजनेचा लाभ घेण्याचा मोह सरकारी बाबू लोकांनाही आवरता आलेला नाही. जिल्ह्यातील १ हजार ६५६ नोकरदारांनी या योजनेचा लाभ घेतला असल्याची धक्कादायक बाब आता समोर आली आहे.

शासनाकडून दारिद्र्य रेषेखालील कुटूंबासाठी तसेच अल्प उत्पन्न गटातील कुटूबांना शिधा वाटप केंद्रांवर धान्य वितरित केले जाते. मात्र, जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांनी आपले उत्पन्न लपवून मोफत धान्य योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. आधार लिंकीग प्रणालीमुळे सरकारी बाबू लोकांची ही मोफत धान्याची उचलेगिरी उघडकीस आली आहे. ही बाब लक्षात येताच पुरवठा विभागाने या कर्मचाऱ्यांचा धान्य पुरवठा बंद केला आहे. तसेच, धान्य उचल करणाऱ्यांची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे. या चौकशी समितीच्या अहवालानंतर कर्मचाऱ्यांकडून वसुली केली जाणार आहे.

आधार कार्ड आणि मोबाइल क्रमांक लिंकिंग केल्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांची नावे पुढे आली आहेत. यातूनच मोफत धान्य किती कर्मचाऱ्यांनी उचलले हे देखील आता समोर आले आहे. आता किती वर्षांपासून हे कर्मचारी मोफत रेशन उचलत आहेत, याबाबतची चौकशी सुरू करण्यात आली आहे. रेशनवर मोफत धान्याची उचल करणारे हे कर्मचारी कधीपासून सेवेत आहेत, धान्याची उचल कधीपासून केली, याची माहिती घेतली जाणार आहे. यानंतर कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होण्याची शक्यता आहे.

> मोफत धान्य योजनेचा लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यासाठी एका समितीची स्थापना केली आहे. हि समिती लवकरच त्यांचा अहवाल येत्या काही दिवसांत सादर करेल. यानंतर जबाबदारी निश्चित करून योग्य कारवाई केली जाईल. सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना शुभ्र कार्ड मिळावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत.
> - सर्जेराव सोनवणे, जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड

www.krushival.in कृषीवल रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

बालांगण

संगणक घेतो 'बुद्धिमान' निर्णय

मित्रांनो... शिकणे, मागील अनुभवाची तुलना करणे, निर्णय घेणे आणि त्यावर कृती करणे ही मानवी बुद्धिमत्तेची गुरुकिल्ली आहे. भूतकाळातील अनुभवातून शिकून अधिकाधिक गुंतागुंतीचे निर्णय घेऊ शकतो. असेच शिकत शिकत माणसाने अनेक प्रकारची तांत्रिक प्रगती केली आहे. त्यातूनच आता कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित काम आपल्याला बघायला मिळते. तुम्हीही याबद्दल ऐकून असाल. मुलांनो, ही यंत्रे किंवा संगणक मोठ्या प्रमाणात माहिती साठवू शकतात आणि त्यावर अचूक आणि आश्चर्यकारक वेगाने प्रक्रियाही करू शकतात. त्यांच्याकडे शिकण्याची आणि 'बुद्धिमान निर्णय' घेण्याची क्षमता आहे.

अशी हुशार मशीन बनवण्यासाठी स्मृती किंवा जागा आवश्यक असतेच त्याचबरोबर तार्किक निष्कर्षांपर्यंत येण्यासाठी अनुभवांची तुलना करणारी प्रणालीदेखील अशा यंत्रांमध्ये असणे गरजेचे असते. हे बुद्धिमान मशीन यावरुनच आपल्याला योग्य ते परिणाम देऊ शकते. आता शास्त्रज्ञ नवीन सॉफ्टवेअर प्रोग्राम तयार करत आहेत जे संगणकात मानवी शिक्षणाची प्रक्रिया तयार करण्याचा प्रयत्न करु शकेल. असे कार्यक्रम मेंदूच्या कार्याची कॉपी करण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रोग्रामला 'न्यूरल नेटवर्क' म्हणतात. तुम्हाला माहिती आहेच की, आपला मेंदू न्यूरॉन्स नावाच्या लाखो घनतेच्या पेशींनी बनलेला असतो. प्रत्येक न्यूरॉन अशा अब्जावधी न्यूरॉन्सच्या जाळ्यातील एका लहान स्विचसारखा आहे. एखादी विशिष्ट माहिती मेंदूपर्यंत पोहोचतो, तेव्हा या न्यूरॉन्सचा वापर होतो आणि संदेशवहनाचे काम होते.

स्मार्ट टेक

थोडक्यात मेंदूतील न्यूरल नेटवर्क दिव्यांच्या माळांसारखे आहे. मेंदूतील प्रत्येक चेतापेशी किंवा न्यूरॉन प्रकाशाच्या बल्बप्रमाणे कार्य करते. न्यूरल नेटवर्कमध्ये असेच सॉफ्टवेअर प्रोग्राम वापरून संगणकात मेंदूच्या कार्याची नक्कल करणारी यंत्रणा स्मार्ट मशीन्समध्ये कार्यान्वित केली जाते. यातूनच नंतर मोठ्या प्रमाणात माहितीचे नमुने वर्गीकृत आणि ओळखण्याची क्षमता निर्माण होते. हे सर्व अत्यंत वेगाने आणि अचूकतेने होते.

कॅरोलिना आणि कयाकिंग

कैसा किंवा कॅरोलिना हा फिनलँडमध्ये खेळला जाणारा खेळ आहे. या खेळाची सुरूवात रशियामध्ये झाली. हा खेळ तिथे आजही खेळला जातो. रशियन पिरॅमिड या क्रीडाप्रकाराशी कॅरोलिनाचा जवळचा संबंध आहे तसंच तो बराचसा बिलियर्डसारखा खेळ आहे. रशियन पिरॅमिडचं टेबल १२ फूट लांब असतं तर कॅरोलिनाच्या टेबलाची लांबी १० फूट असते. या खेळात दोन खेळाडू असतात. खेळाची पहिली जागतिक अजिंक्यपद स्पर्धा एप्रिल २०१० मध्ये आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ३३ देशांमधील स्पर्धक सहभागी झाले होते.

कयाकिंग ही बोटींची शर्यत आहे. यात कयाकचा वापर करून बोट वल्हवली जाते. हजारो वर्षांपूर्वी कयाकची निर्मिती करण्यात आली होती. आर्टिक महासागराच्या उत्तरेला राहणाऱ्या एस्किमो लोकांनी कयाक बनवले होते. अठराव्या शतकाच्या मध्यावर

कयाकला प्रचंड लोकप्रियता मिळाली. हा क्रीडाप्रकार युरोपमध्ये चांगलाच लोकप्रिय झाला. जर्मन आणि फ्रेंच पुरूषांनी कयाकिंग खेळ म्हणून स्वीकारला. १९३६ च्या बर्लिन ऑलिम्पिकमध्ये प्रथमच कयाकिंगचा समावेश करण्यात आला. हा क्रीडाप्रकार अमेरिकेतही पोहोचला आहे. आता ऑलिम्पिकमध्ये कयाकिंगशी संबंधित दहा स्पर्धांचं आयोजन केलं जातं. हा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा खेळ आहे.

फन टाईम

फोटोनिक्सविषयी...

विज्ञान शाखेत रस असलेले फोटोनिक्सची निवड करून उत्तम करीअर घडवू शकतात. फोटोनिक्समध्ये विज्ञानाचा खोलात जाऊन अभ्यास करावा लागतो. फोटोनिक्सचा अभ्यास पूर्ण करून तुम्ही विविध कंपन्यांमध्ये इंजिनिअर, तंत्रज्ञ किंवा शास्त्रज्ञ म्हणून काम करू शकता. विद्यापीठं तसंच सरकारी कार्यालयांमध्येही या क्षेत्रातील तज्ज्ञांना संधी मिळू शकते. पदानुसार कामाच्या स्वरूपात बदल होतो. शास्त्रज्ञांना फोटोनिक्समध्ये संशोधन करावं लागतं तर इंजिनिअर फोटोनिक्सशी संबंधित उपकरणं बनवतो. तंत्रज्ञ इंजिनिअर्सना सहाय्य करतात.

फोटोन्सच्या अभ्यासाला फोटोनिक्स असं म्हटलं जातं. हे पुढच्या पिढीचं तंत्रज्ञान आहे असं मानलं जातं. इलेक्ट्रॉनिक्स हे २० व्या शतकातलं तंत्रज्ञान होतं. तर फोटोनिक्स हे २१ व्या शतकातलं तंत्रज्ञान असेल. हे तंत्रज्ञान प्रकाशाच्या ऊर्जेवर काम करतं.

कोण होणार?

१९६० मध्ये लेझर किरणांच्या शोध लागल्यानंतर फोटोनिक्सचा उदय झाला होता. पण दूरसंचारात त्याचा वापर ७० च्या दशकानंतरच सुरू झाला. फोटोनिक्समध्ये पदवी मिळवलेल्यांना भविष्यात बरीच मागणी असेल. करीअरची वेगळी वाट निवडायची असेल तर फोटोनिक्सचा विचार करता येईल.

खजिना होईल खुला

मित्रमैत्रिणींनो, तुम्हाला खेळ आवडतात ना? आवडत्या खेळाविषयीची माहिती मिळवायची कुठून असा प्रश्न तुम्हाला पडतो. खेळांशी संबंधित बरीच मासिकं, पुस्तकं असतात. पण यासोबतच इंटरनेटवरही माहितीचा खजिना उपलब्ध आहे. त्यासाठी तुम्ही sportsillustratedkids.com म्हणजे sikids.com या साईटला भेट देऊ शकता.



इथे तुम्हाला बेसबॉल, फुटबॉल, हॉकी, सॉकर, बास्केटबॉल या खेळांसह ऑलिम्पिकसंबंधीची माहिती मिळेल. युवा खेळाडूंचा संघर्ष जाणून घेता येईल. इथल्या गेम्स या विभागात गेल्यावर तुमच्यासमोर विविध गेम्सचा खजिनाच खुला होईल. वेळ घालवण्यासाठी तुम्ही हे गेम्स खेळू शकता. किड रिपोर्टर नावाचा एक विभागही आहे. या विभागातही क्रीडाविषयक माहिती उपलब्ध आहे. द ऑलिम्पिक या विभागात तुम्ही ऑलिम्पिकबाबतचं बरंच काही जाणून घेऊ शकता. स्पोर्टस किड्स या विभागात छोट्या खेळाडूंची माहिती आहे. या खेळाडूंकडून तुम्हाला प्रेरणा मिळू शकेल. मग काय, तुमच्यातही खेळाडू दडला असेल तर या साईटला भेट द्या आणि स्मार्ट बना.

नॉलेज अपडेट

उगवत्या सूर्याचा देश

प्रत्येक देश वेगळा. तिथली भाषा, संस्कृती, परंपरा, सण, चलन सगळं काही वेगळं. त्यामुळेच आपल्याला परदेशाचं आकर्षण असतं. तिथले लोकं कसे रहात असतील, काय काम करत असतील इथपासून त्या देशात पिकणाऱ्या फळं आणि भाज्यांपर्यंत बरंच काही जाणून घ्यायचं असतं. चला तर मग, आज जपानची सफर करू या.

जपान हा पूर्वेकडचा देश. त्यामुळेच त्याला उगवत्या सूर्याचा देश असं म्हटलं जातं. या देशात छोटी-मोठी मिळून ६८५२ बेटं आहेत. टोकियो ही जपानची राजधानी. हा देश अनेक अर्थांनी वेगळा आहे. इथली भौगोलिक परिस्थिती वैशिष्ट्यपूर्ण आहे. या देशात २०० पेक्षा जास्त ज्वालामुखी आहेत. जपानचा जवळपास ७० टक्के भूभाग डोंगराळ आहे. 'माउंट फुजी' हे जपानमधलं सर्वात उंच पर्वत शिखर आहे तसंच इथे याच नावाचा जागृत ज्वालामुखी आहे. जपानला दरवर्षी जवळपास १५०० भूकंपाचे धक्के बसतात. या देशाला भूकंप आणि त्सुनामीचा सर्वात जास्त धोका आहे.

या देशात लेखनाच्या चार पद्धती आहेत. सुमो रेसलिंग हा जपानचा राष्ट्रीय खेळ आहे. ग्रेटर टोकियो हा जगातला सर्वाधिक शहरीकरण झालेला भाग आहे. ३० दशलक्षांपेक्षा जास्त लोक या भागात राहतात. टोकियोतलं 'त्सुकिजी' हे जगातलं सर्वात लांब माशांचं मार्केट आहे. जपान हा ऑटोमोबाईल क्षेत्रातला आघाडीचा देश आहे. इथले लोक भरपूर प्रमाणात भात खातात. नाश्त्यापासून रात्रीच्या जेवणापर्यंत त्याच्या आहारात तांदळापासून बनलेल्या पदार्थांचा समावेश असतो. जपानमध्ये तांदूळ, भाज्या, बीट, यांचं उत्पादन होतं. येन हे जपानचं चलन आहे. या देशात जपानी भाषा बोलली जाते. इथले लोक बौद्ध आणि शिंतो अशा दोन धर्मांचं पालन करतात. धर्मांचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव नसला तरी काही धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं.

JAPAN
Tokyo
Osaka
Kyoto
Nagoya

सफर देशांची

पूर्ण करा ग्रुप प्रोजेक्ट

छोट्यांनो, आता शाळा नसली तरी नव्या वर्षात तुम्हाला शाळेत ग्रुप प्रोजेक्ट्स दिली जातील. हे प्रोजेक्ट्स वर्गातल्या मित्रमैत्रिणींसोबत, इतर सहकाऱ्यांसोबत पूर्ण करायचे असतात. हे प्रोजेक्ट्स यशस्वी होण्यासाठी नेमकं काय करायला हवं ते आत्तापासून जाणून घ्या.

✻ प्रोजेक्टचा ग्रुप ठरल्यानंतर तुम्ही सगळ्यांनी एकत्र चर्चा करायला हवी. प्रत्येकाने आपले विचार मांडायला हवेत. प्रत्येकाकडे वेगवेगळी कौशल्यं असतात. कोणाला छान चित्र काढता येतं, कोणाचं हस्ताक्षर चांगलं असतं तर कोणाला छान कल्पना सुचतात. या कौशल्यांनुसार कामाची विभागणी करा.

✻ तुम्हाला ग्रुपचं नेतृत्त्व मिळालं असेल तर कामाची विभागणी सम प्रमाणात करा. कोणाला जास्त काम तर कोणाला कमी काम असं करू नका. दुजाभाव करू नका.

✻ तुम्ही ग्रुपचं नेतृत्त्व करत नसलात तरी वेगवेगळ्या भूमिका पार पाडू शकता. सहकाऱ्यांना बोलतं करू शकता. मुद्दे लिहून घेऊ शकता. प्रश्न विचारू शकता. वाद झाला तर तो सोडवू शकता.

स्टडी टिप्स

हात का धुवायचे?

उन्हाच्या या दिवसात रोगराई पसरण्याचं प्रमाण जास्त असतं म्हणूनच काहीही खाण्याआधी हात स्वच्छ धुणं गरजेचं असतं. आजकाल जाहिरातींमधूनही हात धुण्याचं महत्त्व पटवून दिलं जात आहे. जंतू सगळीकडे असतात. ते हातांना चिकटतात आणि आपल्या शरीरात जातात. आजारी असताना हात नीट धुतले नाही तर संसर्ग वाढण्याची शक्यता असते. आजारी असताना आपली रोगप्रतिकारशक्ती कमी झालेली असते. त्यामुळे इतर रोग होण्याची शक्यता वाढते. तुमच्यापैकी बऱ्याच मुलामुलींना हात धुण्याचा कंटाळा येत असेल. तुम्ही खेळून घरी आल्यावर भूक लागली म्हणून हात न धुता खात असाल. अशावेळी आज सकाळपासून आपण कशाकशाला हात लावला आहे हे आठवण्याचा प्रयत्न करा. तुम्ही घरातल्या टेलिफोनपासून मैदानातल्या कुत्र्याच्या पिलापर्यंत बऱ्याच गोष्टींना हात लावला असेल. बाथरूममध्ये गेला असाल, नाक

पुसलं असेल. या प्रत्येक ठिकाणी जंतू असतातच. हे जंतू तुमच्या हातांना चिकटतात. अशावेळी जर हात न धुता खाल्लं तर काय होईल याचा फक्त विचार करून बघा. हे जंतू पोटात जातील आणि विविध आजारांना निमंत्रण मिळेल.

हात धुणं का गरजेचं आहे हे आता तुमच्या लक्षात आलं असेल ना? अनेक मुलं मुली बाथरूममधून बाहेर आल्यानंतर हात धुवत नसल्याचं एक सर्वेक्षण सांगतं. पण तुम्ही असं करू नका. शक्य असेल तर कोमट पाण्याने हात धुवा. कोणत्याही साबणाचा वापर तुम्ही करू शकता. दोन्ही हात एकमेकांवर नीट घासा. मागून, पुढून, बोटांच्या मधून हात नीट स्वच्छ करा. नळाखाली हात धरून खसखसून धुवा. रूमालाने नीट कोरडे करून घ्या. बाहेरच्या स्वच्छतागृहात गेल्यावर हँडल किंवा बेसिनच्या नळाला हात लावताना पेपर नॅपकिनचा वापर करा. साबण किंवा पाणी नसेल तर सॅनिटायझरचा वापर करता येईल. बाहेर जाताना सॅनिटायझर कायम सोबत ठेवा. तुम्ही हात धुण्याची सवय लावून घेतली तर वरचेवर आजारी पडणार नाही.

हेल्थ वेल्थ

ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) मीनाक्षी मंदिर कुठे आहे?
२) प्रशासकीय सेवा ही संकल्पना भारतात पहिल्यांदा कोणी आणली?
३) अमजद अली खान कोणतं वाद्य वाजवतात?
४) सालारजंग वस्तूसंग्रहालय कोणत्या शहरात आहे?
५) हवाना ही कोणत्या देशाची राजधानी आहे?
६) २०१८ च्या फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेच्या पुरूष एकेरीचं विजेतेपद कोणी पटकावलं?
७) रियाल हे कोणत्या देशाचं चलन आहे?
८) युनेस्कोचं मुख्यालय कुठे आहे?
९) पुष्कलावती ही कोणत्या प्राचीन राज्याची राजधानी होती?
१०) भारतातली पहिली बँक कोणती?

उत्तरं: १) मदुराई २) लॉर्ड कॉर्नवॅलिस ३) सरोद ४) हैदराबाद ५) क्युबा ६) राफेल नदाल ७) सौदी अरेबिया ८) पॅरिस ९) गांधार १०) बँक ऑफ हिंदुस्थान



फोनचा स्पीड वाढवायचा तर...

अँड्रॉइड स्मार्टफोन सतत अपडेट होत असतो. फोनचा प्रोसेसर,रॅम, स्टोरेज यांची क्षमता वाढते आहे. असं असलं तरी फोन स्लो किंवा हँग होण्याची समस्याही दिसून येते. कॅशे डाटा, वापरात नसलेल्या फाईल्स आणि फोल्डर्समुळे फोन स्लो किंवा हँग होऊ शकतो. स्मार्टफोनच्या सुरक्षेसाठी अनेक जण अँटी व्हायरस ॲप्स डाउनलोड करून घेतात. पण कोणतंही ॲप डाउनलोड न करताही फोनचा स्पीड वाढवता येतो. कसा? जाणून घेऊ या.

✻ फोनचा होम स्क्रीन मोकळा ठेवा. फोनमधलं लाईव्ह वॉलपेपर किंवा वेदर अपडेटचं विजेट काढून टाका. होम स्क्रीनवरच्या नको असलेल्या विंडोज काढून टाका. या सगळ्यामुळे फोन स्लो होण्याची शक्यता असते.

✻ क्रोम ब्राउजरमधला 'डाटा सेव्हर' ऑप्शन ऑन करा. यामुळे साईट किंवा पेज लवकर लोड होतं तसंच डाटासुद्धा कमी खर्च होतो. यामुळे इमेज तसंच व्हिडिओचा दर्जा थोडा कमी होत असला तरी फोन हँग किंवा स्लो होत नाही.



✻ ऑटो सिंक ऑप्शन बंद करून टाका. बरीच ॲप्स या ऑप्शनमुळे डाउनलोड होतात. डाटा सतत ऑटो सिंक होत असेल तर ॲपची गती मंदावते. यामुळे फोनवरही ताण येतो.

✻ स्मार्टफोनमध्ये प्रत्येक ॲपचा कॅशे डाटा जमा होतो. तो वेळोवेळी डिलिट करायला हवा. यात काही जंक फाईल्सही असतात. त्यामुळे फोन स्लो होऊ शकतो.

✻ फोनमध्ये ओपन केलेली ॲप्स बंद केल्यानंतरही ती बॅकग्राउंडमध्ये सुरू असतात. त्याचा रॅम आणि प्रोसेसरवर ताण येतो. त्यामुळे बॅकग्राउंडमध्ये सुरू असलेली ॲप्स बंद करा.

✻ फोनमध्ये सॉफ्टवेअरसंबंधीची अपडेट्स आली तर फोन वेळोवेळी अपडेट करा. अपडेट केल्याने फोनच्या कामगिरीत सुधारणा होते.

गॅझेट टॉक

ठिपके जुळवा



दोस्त हे मस्त

ग्लास फ्रॉग्ज

ग्लास फ्रॉग्ज म्हणजे पारदर्शी बेडूक. या बेडकांची त्वचा पारदर्शी असते. त्यामुळे त्यांचे आतले अवयव आपण बघू शकतो. त्यांचं हृदय, यकृत, पचनसंस्था आणि मादी बेडकांची अंडीही आपल्याला बघता येतात. हे बेडूक रात्री बाहेर पडतात. त्यामुळे शत्रूंपासून त्यांचं रक्षण होतं.

खादाडी

सीसमे नूडल्स

नूडल्स तुम्हाला आवडतातच. सीसमे नूडल्स म्हणजे तीळ घातलेले नूडल्स हा वेगळा प्रकार तुम्ही ट्राय करू शकता. यासाठी स्पॅगेटी नूडल्स घ्या. पाव कप सोया सॉस, ३ लवंग आणि लसूण कुटून घ्या. दोन चमचे आल्याची पेस्ट, २ चमचे व्हिनेगार, एक चमचा तीळाचं तेल, एक चमचा घरी वापरत असलेलं तेल, कांद्याची पात, भाजलेले तीळ,मीठ आणि मिरपूड असं साहित्य घ्या. नूडल्स मीठ घातलेल्या पाण्यात शिजवून घ्या. आता दुसऱ्या भांड्यात सोया सॉस, लसूण, आलं, व्हिनेगर, तेल घाला. एकत्र करून घ्या. हे भांड गॅसवर ठेऊन सर्व शिजवून घ्या. आता नूडल्स घाला. नीट हलवून घ्या. त्यावर पातीचा कांदा, थोडं मीठ घाला. नंतर त्यावर तीळ आणि मिरपूड भुरभुरा. गरमागरम खा.

लाईफस्टाईल

महत्त्व नाश्त्याचं

रात्री जेवल्यानंतर सकाळपर्यंत आपल्या पोटात काहीही जात नाही. त्यामुळे सकाळी पोट रिकामं असतं. अशा वेळी सकाळची न्याहारी महत्त्वाची ठरते. कितीही घाई असली तरी सकाळचा नाश्ता चुकवू नये. नाश्ता म्हणजे आपल्या शरीराचं इंधन असतं. शाळेत गेल्यावर तुम्हाला छान अभ्यास करता यावा यासाठी नाश्ता करणं गरजेचं आहे.

योगा टाईम

अंकुश मुद्रा

कार्यक्षमता वाढवण्यासाठी, उत्साही राहण्यासाठी तुम्ही अंकुश मुद्रा करू शकता. अंकुश मुद्रेमुळे आयुष्याला शिस्त लागते. ही मुद्रा दररोज केल्याने बरेच लाभ होऊ शकतात. अत्यंत सोपी अशी ही मुद्रा करण्यासाठी पद्मासनात बसा. त्यानंतर मधलं, त्याच्या शेजारचं बोट आणि करंगळी ही तीन बोटं दुमडून घ्या. त्यानंतर मधल्या आणि त्याच्या शेजारच्या बोटावर अंगठ्याने दाब द्या. पहिलं बोट सरळ ठेवा. ८ ते १५ मिनिटं ही मुद्रा करा.



कलासक्त

आठवणीतला 'शोले' चित्रपट

श्रीराम शेट्ये



१९७५ साली शोले चित्रपट आला. यातील होळीचे प्रसंग हृदयाला भिडणारे आहेत. शोले चित्रपटाचे निर्माते जी. पी. सीप्पी होते. या चित्रपटाचे दिग्दर्शन रमेश सीप्पी यांनी केले आहे. सन १९७२ मध्ये धर्मेन्द्र, हेमा मालिनी, संजीव कुमार यांना घेऊन बनविलेला 'सीता और गीता' हा चित्रपट सुपरहीट झाला होता. तेव्हाच रमेश सीप्पी यांनी ठरवले होते एक भव्य दिव्य चित्रपट बनवायचा. सलीम खान व जावेद अख्तर यांना कहाणी लिहायला सांगण्यात आले. तासन्तास रूमचा दरवाजा बंद करून रमेश सीप्पी आणि सलीम - जावेद यावर काम करीत असत. सलीम लहान असताना त्याचे वडील चंबळ खोऱ्यातील गब्बर नावाच्या डाकूची कहाणी सांगत असत तीच कहाणी निवडण्यात आली.



जय आणि वीरू हे दोन जीवलग मित्र सलीम ज्या कॉलेजात शिकत होता त्याच कॉलेजात शिकत होते. यावरूनच या पात्रांना नावे ठरली जय आणि वीरू. कहाणी सुरू होते तेंव्हा ठाकूर बलदेव सिंह (संजीव कुमार) एक पोलीस अधिकारी असतो. तो खतरनाक डाकू गब्बर सिंहला पकडतो व जेलमध्ये टाकतो.

गब्बर जेलमधून पळून जातो व ठाकूरच्या घरातील संपूर्ण कुटुंबियांची हत्या करतो. ठाकूरची सुन राधा मंदिरात गेलेली असते म्हणून वाचते.

ठाकूर रागाने बेभान होऊन गब्बर बरोबर लढायला जातो पण गब्बर ठाकूरचे दोन्ही हात कलम करतो.

निवृत्त झालेला ठाकूर मग वीरू आणि जय या दोन शूर कैद्यांना जेलरची परवानगी घेऊन गब्बरचा बदला घेण्यासाठी रामगडला आपल्या घरी घेऊन येतो. त्यातील एक प्रसंग आहे. संध्याकाळची वेळ असते. ठाकूरची विधवा सुन 'राधा' (जया भादुरी) बकरीला बांधण्याचा प्रयत्न करीत असते पण ती बकरी तीच्या हाती लागत नाही. जय (अमिताभ) तीला बकरी पकडून देतो. सफेद साडीतल्या वीपन्ना अवस्थेतल्या राधाकडे पाहून तिची अशी अवस्था का झाली असावी? असा मनात जय विचार करीत असतो.

एवढ्यात ठाकूरचा सेवक रामलाल (सत्तेन कपूर) जयला तिची कहाणी सांगतो. क्लायमॅक्स दाखवला जातो.

ठाकूर (संजीव कुमार) टांग्यात बसून आपला मित्र नर्मलाजी याच्याकडे होळी निमित्त भेटायला जात असतो. रामलाल टांगा हाकत असतो. ठाकूर गावातून टांग्यात बसून जात असताना एक परकर चोळीतली चुणचुणीत अल्लड तरूणी हातात होळीच्या रंगांनी भरलेली पिचकारी घेऊन टांग्याच्या मागून अत्यंत उत्साहात धावत समोर येते. ती ठाकूरच्या मित्राची मुलगी राधा असते. 'होली है भाय होली है, बुरा न मानो होली है'असे म्हणत टांग्याच्या मागून धावत येते. रंगाने भरलेली पिचकारी ठाकूर अंकलच्या अंगावर उडवते. ठाकूर म्हणतो 'अभी से रंग लगावोगी तो तेरे बाप से कैसे होली खेलूंगा?'

ती म्हणते, 'बाबुजी के साथ क्या होली खेलोगे? उनको होली खेलना आता कहां है? सुबह से घर के सामने बुडा लगा के बैठे है, जब भी कोई आया बडा हुआ तो वह उसके पैर छू लेते है, छोटा हुआ तो वह उनके पैर छूता है, थाली मे से चुटकीभर रंग ले लीया लगाया माथे पर गले मिल गये बस, हो गयी उनकी होली यह भी कोई होली है? होली तो हम लोग खेलते है 'ठाकूर हसून म्हणतो, 'तूम लोग कैसे होली खेलते है?'

राधा, 'हम लोग! हम लोग वो पारू है ना उसके घर के आंगन मे एक पानी की नाल है उसमे रंग घोल देते है, सब लोग लोगो पे रंग डालते है, और हम लोगोंको रंग मे डालते है, जो भी आया पानी मे ढकेल दिया धपाक....' ठाकूर मित्राच्या घरी पोहचतो. राधा मिठाई घेऊन येते,' मिठाईवाला भाय मिठाई! मिठाई ले लो!! ठाकूर चाचा मुह खोलो! रामलालजी मुह खोलीए! असं म्हणत मिठाई भरवते. राधा नंतर म्हणते, 'बाबूजी मै अपने सहेली के पास होली खेलने जाऊं?' ठाकूर अंकल म्हणतात, 'अभी तक दिल नहीं भरा तेरा होली से?' राधा म्हणते, 'ठाकूर चाचा, कैसे भरेगा दिल? होली रंगो का त्योंहार है लाल, पिले, हरे, निले जरा आप ही सोचीए रंग नही होता तो कैसे बेरंग होती दुनिया?'

हा सीन संपतो आणि रामलाल जयला म्हणतो. 'देखो कैसी बेरंग हो गयी है इसकी दुनिया?' भविष्यात हीच मुलगी ठाकूरची सुन (बहू) होते. एका तरूण अल्लड उत्साही आनंदी मुलीच जीवन ऐन तारूण्यात विधवा बनवून गब्बर सिंहने उद्ध्वस्थ केलेले असते. शोले एक अप्रतिम चित्रपट आहे ज्याला 'फिल्म ऑफ द मिलेनियम' घोषीत करण्यात आले आहे.



हा शतकातील सर्वोतम चित्रपट असला तरी सुरवातीला हा चित्रपट दोन आठवडे फ्लॉप चालला होता. समीक्षकांनी टीकेची झोड उठवली होती. परंतू नंतर हा चित्रपट सुपरहीट झाला. मिनर्व्हा थिएटरला सलग पाच वर्षे हाऊसफूल चालत होतो. अवघ्या तीन करोड मध्ये बनविलेला हा चित्रपट पंचेचाळीस करोड कमवून चालूच होता. या चित्रपटासाठी धर्मेन्द्र, हेमा मालिनी आणि संजीव कुमार यांची निवड ठरलेली होती. परंतू जय च्या रोलसाठी शत्रुघ्न सिन्हा यांची निवड होणार होती. परंतू सलीम जावेद यांनी अमिताभचे नाव सुचवले हा नविन अभिनेता या भुमिकेसाठी योग्य आहे असे त्यांनी रमेश सीप्पी यांना सांगितले. गब्बरच्या भुमिकेसाठी डैनी डेन्जोगपा यांना घेण्याचे ठरले होते. परंतू डैनी ची शुटींग परदेशात चालू असल्यामुळे तारखा मिळत नव्हत्या. म्हणूण सलीम खान यांनी नवोदित अमजद खान यांची शिफारस केली. पण शुटींग दरम्यान त्यांचा आवाज कोणालाच पसंद नव्हता. अमजदला सगळे बाहेर काढण्याच्या मार्गावर होते. पण बऱ्याच वेळा रीटेक केल्यावर नशीबाने अमजद खान यांना ती अजरामर भुमिका साकार करता आली. ठाकूरची भुमिका धर्मेन्द्रला हवी होती. परंतू केवळ हेमा मालिनी सोबत रोमांस करायची भुमिका आहे या कारणाने त्यांने वीरू ची भुमिका स्वीकारली होती. कारण संजीव कुमार आणि हेमा मालिनी यांचे आधीच एकमेकांवर प्रेम होतेच. परंतु काही करून धर्मेन्द्रला त्या दोघांना एकत्र येऊ द्यायचे नव्हते.अप्रतिम लोकेशन असलेल्या कर्नाटकातील रामनगर या पहाडी भागात या चित्रपटाचे चित्रीकरण करण्यात आले होते. रेल्वेचा सिन पनवेल येथे चित्रित करण्यात आला होता. द्वारका दीवेचा यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण चित्रीकरण(सिनेमेटाग्राफी) केले आहे. आनंद बक्षी यांची अर्थपूर्ण गीते आणि आर. डी. बर्मन यांचे सुमधूर संगीत यांनी चित्रपटांच्या इतिहासातील गौरीशंकर गाठले आहे. संजीव कुमार, धर्मेन्द्र, अमिताभ, जया भादुरी, हेमा मालिनी, अमजद खान, जगदिप, असरानी यांच्यासारख्या कसदार अभिनेत्यांनी सर्वस्व पणाला लाऊन अभिनयाची पराकाष्ठा केली आहे. हेलन आणि जलाल आगा यांचे एकच गाणे आहे. परंतू ते अजरामर झाले. अशा प्रकारे हा शतकातील सर्वोत्तम चित्रपट साकार झाला आहे. **

प्रदीर्घ कारकिर्दीचा सन्मान

हेलन व अरुणा ईराणी

शरद कोरडे



महाराष्ट्र शासनाने यावर्षी सांस्कृतिक विभागाने यावर्षी 'महाराष्ट्र भूषण' हा पुरस्कार सर्वोत्कृष्ट अष्टपैलू अभिनेता अशोक सराफ यांना जाहीर केल्यानंतर इतर सांस्कृतिक पुरस्कारांचीही घोषणा केली. त्यात गेली तीन वर्षे न देण्यात आलेल्या 'स्व. राजकपूर जीवन गौरव' पुरस्काराचीही घोषणा केलीय. सन २०२० साठी अरूणा ईराणी यांना तर २०२१ साली मिथुन चक्रवर्ती यांना व २०२२ साली हेलेन यांची निवड या पुरस्कारासाठी झाली. हेलेन व अरूणा ईराणी ह्यांनी खूप प्रदीर्घ कारकिर्द हिंदी चित्रपटसृष्टीसाठी दिली आणि रसिकांची मने जिंकली. दोघींनाही चित्रपटसृष्टीत पाय रोवण्यासाठी खूप संघर्ष करायला लागला, दोघींनी नृत्यासोबत काही चित्रपटांतून नायिकेच्या व सहनायिकेच्या भूमिका केल्या. दोघींच्याही कौटुंबिक जीवनात अनेक वादळे निर्माण झाली. दोघींनीही निर्धाराने लढा दिला व आपले चित्रपटसृष्टीतील स्थान पक्के केले. हेलनचा हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश १९५१ मध्ये (आवारा) तर अरूणा ईराणीचा प्रवेश १९६१ मध्ये (गंगाजमुना) झाला.

हेलन हिचा जन्म २१ नोव्हेंबर १९३८ साली ब्रह्मदेश अर्थात आताच्या म्यानमारमध्ये रंगून येथे झाला. वडील जार्ज डिस्मर स्विर्डसन हे ब्रिटीश सैन्यदलात होते व आई मर्लिनही एका दवाखान्यात नर्स होती. तिला रॉजर नावाचा भाऊ व जेनीफर नावाची बहिण होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानने म्यानमारवर आक्रमण केले. या युद्धात हेलनचे वडील जॉर्ज डिस्मर हे धारातीर्थी पडले. अनेक नागरिक आपले प्राण वाचवण्यासाठी जंगलातून मार्ग काढीत भारताच्या दिशेने पळू लागले. हेलनची आई मर्लिन ही सुद्धा आपल्या दोन मुलांसह या समुदायात सामील झाली. आक्रमकांच्या लक्षात येणार नाही अशाप्रकारे हा जमाव लपूनछपून मार्गक्रमण करीत होता. अपुरे अन्न अपुरी वस्त्रे व मरणाच्या भीतीने दिवसरात्र या लोकांचा प्रवास सुरू होता. या चमूंतील अनेक माणसे आजारी पडली, औषधोपचाराच्या व अन्नाच्या अभावी त्यातील अनेकजण मृत्युमुखी पडली. त्यात हेलनच्या आईचा गर्भपात झाला. त्यातूनही हा पायी प्रवास जंगलातून सुरु होता. वाटेत त्यांची गाठ ब्रिटीश सैन्यांतील अधिकाऱ्याशी पडली. त्यांनी या माणसाच्या तातपुरत्या औषधोपचाराची व प्रवासाची व्यवस्था केली. त्यांनी या माणसांच्या तात्पुरत्या औषधोपचाराची व प्रवासाची व्यवस्था केली. अनंत अडचणींनी झेलीत हा गट आसाममधील दिब्रुगडला पोहोचला तेव्हा त्यातील अर्धी अधिक माणसे मृत्युमुखी पडली होती व राहिलेली आजारी पडली. हेलनच्या कुटूंबाने तब्बल दोन महिने हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले व तेथून हे कुटूंब कलकत्याला गेले. तोपर्यंत हेलनचा भाऊ रॉजर याचाही मृत्यू झाला होता. कलकत्याहून हेलन व जेनीफर यांच्यासह तिची आई मुंबईला उपजीविकेचे साधन शोधण्यासाठी आली. मर्लिनही नर्स असल्याने तिला किमान पगाराची नोकरी मिळाली पण अशा तुटपुंज्या आर्थिक मिळकतीवर कुटूंबाचा गुजारा होणे कठीण होते, पण तरीही हेलनच्या आईने आपल्या मुलीची अंगकाठी, तिचा नैसर्गिक सुडौल बांधा, चेहऱ्यावरील निरागस हास्य हे सारे नृत्याला पूरक आहे हे जाणून त्यांनी हेलनला नृत्य विकण्यास प्रेरणा दिली. तिला कथ्थकचे व पाश्चिमात्य नृत्याचे धडे देण्यास सुरूवात केली. तिच्या आहारावर व व्यायामावर त्यांनी जातीने लक्ष ठेवले. ज्या वयात मुलांना चॉकलेट, बिस्कीटे, आईस्क्रीम यांची आवड असते त्या वयात हेलनला त्यापासून दूर ठेवण्यात आले. हिंदी चित्रपटसृष्टीत त्यावेळी नृत्यांगना शिला वाझ व कक्कू मोरॉय यांचे अर्धराज्य होते. त्यातील कक्कू मोरॉय ही हेलनच्या आईची मैत्रीण झाली होती. कक्कूने हेलनला वयाच्या चौदाव्या वर्षीच राजकपूरच्या 'आवारा' मध्ये व विभूती यांच्या 'शबीस्तान' या चित्रपटांत मुख्य नर्तकीच्या मागे नाचणाऱ्या मुलीची भूमिका मिळवून दिली. ते साल होते १९५१. दोन्हीही नावाजलेल्या बनर्सच्या चित्रपटात काम मिळाल्याने व ते चित्रपट यशस्वी झाल्याने हेलनला पुढे कामे मिळू लागली. 'अलिफ लैला' 'मयुर पंख', 'हलाकू', 'मिस्टर लंबू' 'यहुदीकी लडकी', 'चलती का नाम गाडी' आदी चित्रपटांतून तिला कोरसनृत्यात कामे मिळाली. १९५८ मध्ये आलेल्या अशोककुमार मधुबालेच्या 'हावडा ब्रीज' या चित्रपटात तिला प्रथमच आव्हानात्मक सोलो नृत्यात प्रमुख नर्तकीचे काम मिळाले. ओ.पी. नय्यर यांनी संगीत दिलेल्या व गाती दत्त यांनी गाईलेल्या 'मैरा नाम चीन चीन च्यू' या गाण्याला व त्यातील नृत्याला रसिकांनी दाद दिली आणि हिंदी चित्रपटातील हेलनचे युग सुरू झाले. पुढे 'यहुदीकी लडकी', 'मिस्टर लंबू', 'अनाडी', 'हम हिंदुस्तानी', 'यमन' आदी चित्रपटांतून तीने सोलो नृत्ये केली. याचवेळी तिने दोन तेलगु व दोन भोजपूरी चित्रपटांतूनही आपल्या नृत्याची जादू दाखवली.

१९७० मध्ये शक्ती सामंता निर्मित व शम्मीकपूर आशा पारेख अभिनीत 'पगला कही का' या चित्रपटातील सहनायिका होती हेलेन. नायकाच्या प्रेयसीची भूमिका हेलनने केली होती. जिच्यावर नायकाचे जीवापाड प्रेम असते व जिच्याशी त्याला लग्न करायचे अशा जेसी या नृत्यांगनेवर झालेल्या अत्याचाराने नायक वेडा होतो व त्याला वेड्याच्या इस्पितळात ठेवले जाते. जेथे त्याच्यावर डॉक्टर असलेली नायिका आशा पारेख उपचार करते. या चित्रपटात हेलनने आपल्या नृत्यासोबत अभिनयाचे पैलू दाखविले. त्यापूर्वी हिने 'वह कौन थी' मधील तिसरी सहनायिका सादर केली होती. 'चायना टाऊन' मध्ये ही शम्मीकपूरची सहनायिका होती. 'आया तुफान' मध्ये ती दारासिंगची नायिका होती. तर 'चाचाचा' या रोमँटिक चित्रपटात ती चंद्रशेखर याची नायिका होती. या चित्रपटातील 'दो बदन प्यार की आगमे जल गये' हे गाणे खूप गाजले होते.

मधल्या काळात हेलनच्या आयुष्यात प्रचंड वादळ निर्माण झाले. प्रेम नारायण आरोरा नामक एक निर्माता दिग्दर्शक हेलनच्या आयुष्यात आला. त्याने 'रेल का डिब्बा', 'लैला मजनू', 'झिंदाबाद अलिबाबा अल्लादीन', 'दिल दौलत दुनिया' आदी चित्रपटांची निर्मिती केली होती. त्याने हेलनशी करारनामा करून त्यात त्याच्या सिने संस्थेच्या प्रत्येक चित्रपटात तिला भूमिका देण्याचा व योग्य मानधन देण्याचा करार केला, पण हेलनने पुढे कोणत्याही बाहेरच्या चित्रपटात आरोरा यांची परवानगी न काम करू नये अशी अटी घातल्या. अशा कराराचा पूर्वानुभव नसल्याने हेलनने त्यावर सह्या केल्या. आणि ती त्या करारात गुंतून गेली. आरोराने पुढे काही मोजकेच चित्रपट केले. हेलनने आरोराशी विवाह केला व ती त्याच्या जाळ्यात अडकून गेली. बाहेरून येणाऱ्या चित्रपटांच्या ऑस्कर स्विकारण्यापूर्वी तिला आरारोचे मन वळवावे लागत असे. तिला मिळणारे पैसे त्याच्या खात्यात जाऊ लागले. या सर्व प्रकरणात हेलन एका विचित्र परिस्थितीतून जात होती. सुमारे दहा वर्षे तिने अशा प्रकारच्या संकटांचा सामना केला. हेलनच्या एका हितचिंतकाने (बहुधा सलीम खानने) तिला सल्ला दिला अशा प्रकारच्या परिस्थितीतून तुला बाहेर काढायला हिंदी चित्रपटसृष्टीतील एकच कलाकार तुला मदत करू शकतो. ज्याचा शब्द या इंडस्ट्रीमध्ये अखेरचा मानला जातो. तो माणूस म्हणजे दिलीपकूमार! हेलनने दिलीपकुमारची भेट घेऊन त्याला सर्व परिस्थिती समजावून मदतीची याचना केली. दिलीपकुमारने तिला सहकार्याचे आश्वासन दिले. मात्र या घटनेची कुठेही वाच्यता न करता शांत राहून प्रतिक्षा करण्याची सूचना त्याने हेलनला दिली. सर्व काही ठिक होईल असे म्हणून दिलीपकुमारने हेलनला निरोप दिला.

पुढे हेलनने काजल-१९६५, लव्ह अँड मर्डर-१९६६, तिसरी मंझील- १९६६, दस लाख- १९६६, ज्वेलथिफ- १९६७, प्रिन्स- १९६९, शोले-१९७१, बैराग- १९७६, रामबलराम- १९८०, खामोशी द म्युझिकल- १९६६ आदी चित्रपटांतून लहान मोठ्या भूमिका केल्या. मुमताज, शिकार, ऐलान, खामोशी द म्युझिक मधील भूमिकांसाठी तिला सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री म्हणून फिल्मफेअरचे मानांकन मिळाले होते. पण अखेरीस 'लहू के दो रंग' या १९८० च्या चित्रपटांतील तिने केलेल्या विनोद खन्नाच्या पत्नीच्या भूमिकेत तिला सर्वोत्कृष्ट सहनायिकेचे फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळाले. फिल्मफेअरने १९९९ मध्ये तिला जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले. भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने २००९ मध्ये तिचा गौरव केला. त्यापूर्वी १९८१ मध्ये हेलनने सलीम खान (सलमानचे वडील) यांच्यासोबत विवाह केला होता. हेलन सिने कारकिर्द तब्बल सत्तर वर्षांची होती व तिने सुमारे १००० चित्रपटांतून कामे केली.

(पूर्वार्ध)

'मोऱ्या' सुपरहिट



अनेक अडचणींवर मात करीत अत्यंत चतुराईने 'मोऱ्या' हा मराठी भाषेतील चित्रपट २२ मार्च २०२४ रोजी प्रथम प्रदर्शित करण्यात आला. निर्मात्यांची विशेष लक्ष पुरवून चित्रपटाच्या कल्पक वितरणासोबत आधुनिक आणि पारंपरिक पद्धतीची सांगड घालत प्रसिद्धी व मार्केटिंग व्यवस्थापन करून मुंबई, व उपनगर, पुणे आणि धुळे या केंद्रांवर लक्ष केंद्रित करून आपला जम बसवत प्रेक्षकांना चित्रपटगृहाकडे येण्यासाठी आकर्षित केले आहे. ऐन राजकीय शिमग्याच्या आयपीएल मोसमात 'मोऱ्या' खरोखर प्रेक्षकांसाठी आकर्षण ठरला आहे. विशेष आकर्षण निर्माण करणारे पोस्टर आणि अत्यंत नजाकतीने कापलेला चित्रपटाचा सुबक ट्रेलर, चित्रपटाचे वेगळे कथागुणधर्म, कलाकारांचा नैसर्गिक अभिनय, संगीत आणि सोशल मीडियावरील चर्चा, पोस्ट पाहून प्रेक्षकांची पाऊले आपसूकच चित्रपटगृहाच्या दिशेने वळत असल्याने विशेष आनंद होत असल्याची प्रतिक्रिया मोऱ्याची शीर्षक भूमिका करणारे अभिनेते आणि लेखक दिग्दर्शक जितेंद्र बर्डे यांनी दिली आहे.

मराठी चित्रपटांच्या ट्रेंडपेक्षा वेगळा विषय असलेल्या 'मोऱ्या'ला मिळत असलेला 'द्विगुणित करणारा प्रेक्षकांचा प्रतिसाद आमचा उत्साह वाढवित असून सर्व टीमने तीन वर्षे घेतलेली मेहनत खऱ्या अर्थाने यशस्वी झाली आहे. येत्या आठवड्यात 'मोऱ्या' महाराष्ट्रातील उर्वरित ठिकाणी आम्ही प्रदर्शित करू, मराठी रसिकांचे प्रेम आम्हाला असेच मिळणार आहे असे 'मोऱ्या'च्या सर्व निर्मात्यांनी म्हटले आहे. **

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)